पेजिनेशनसाठी अनुभवी व्यक्ती पाहिजे
GRAPHIC DESIGNER
Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25

विश्वास पिढ्यान् पिढ्यांचा
काळे ज्वेलर्स
9601222777
9615222777
सोने चांदी हिरे नवरत्न
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर



लग्नाचा बस्ता.. राजेन्द्रमध्ये बांधा!
मेन रोड, संगमनेर. फोन : 02425-225740, 7901031155
१९५९ पासून
विश्वासाची सार्थ परंपरा...
राजेन्द्र

# विद्यार्थ्यांवरील हल्ल्याच्या निषेधार्थ पेटल्या मशाली

## संगमनेरात माजी मंत्री थोरातांच्या नेतृत्वाखाली तरूणांचा संतप्त मोर्चा






युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -दिल्ली येथे विद्यार्थ्यांना झालेल्या लाठी हल्ल्याच्या निषेधार्थ कॉँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वात हजारो संगमनेरकर आज रस्त्यावर उतरले. या घटनेचा तीव्र निषेध करत पंतप्रधान, गृहमंत्री व शिक्षण मंत्री यांनी तातडीने राजीनामा द्यावा अशी मागणी करताना हजारो युवक विद्यार्थी महिला व नागरिकांनी केंद्र सरकारच्या विरोधात घोषणाबाजी करून संगमनेर दणाणून सोडले. याचवेळी आंदोलन दडपण्याचा प्रयत्न म्हणजे हुकूमशाही असल्याची टीका कॉँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी केली देश वाचवण्यासाठी तरुणांनी पुन्हा एकदा संघर्ष करण्याची तयारी ठेवा असे आवाहन त्यांनी केले आहे.

संगमनेर शहरात समविचारी पक्षांच्या वतीने विराट मशाल मोर्चा आयोजित करण्यात आला. संगमनेर बस स्थानक ते महात्मा फुले स्मारक इथपर्यंत झालेल्या या रस्त्यामध्ये शहरातील व तालुक्यातील हजारो नागरिक रस्त्यावर उतरले यावेळी कॉँग्रेस नेते बाळासाहेब थोरात, माजी आमदार डॉ सुधीर तांबे, सौ दुर्गाताई तांबे, जिल्हाध्यक्ष सचिन गुजर, वंचित बहुजन आघाडीचे आजीज ओरा, शिवसेनेचे अमोल बोराडे, तालुकाध्यक्ष अजय फटांगरे शहराध्यक्ष सोमेश्वर दिवटे कार्याध्यक्ष ड अमोल शेरकर, ॲड रंजना गवांदे, निखिल पापडेजा, शेखर सोसे, (पान ५ वर)

### हजारो नागरिक रस्त्यावर

**जंतर-मंतर वरील आंदोलनाला पाठिंबा देत व विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठी हल्ल्याचा निषेध करण्यासाठी कॉँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वात आज समविचारी सर्व पक्ष एकत्र आले. संगमनेर शहर व तालुक्यातील हजारो नागरिक महिला युवक रस्त्यावर येऊन केंद्र सरकारच्या विरोधात घोषणाबाजी केली. संगमनेर शहरातून झालेला विराट मशाल मोर्चा हा मोठा लक्षवेधी ठरला.**

# ठाकरे बंधूंकडून रविवारी मोर्चाची हाक




मुंबई (वृत्तसंस्था)

नीट पेपरफुटी प्रकरण आणि देशभरात सुरू असलेल्या विद्यार्थी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेत केंद्र सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. विद्यार्थ्यांच्या आंदोलनावर झालेल्या पोलिसी कारवाईचा निषेध करत दोन्ही नेत्यांनी २६ जुलै रोजी मुंबईत संयुक्त मोर्चा काढण्याची घोषणा केली.

राज ठाकरे म्हणाले की, देशभरात सुरू असलेले विद्यार्थी आंदोलन पूर्णपणे शांततापूर्ण होते. मात्र, त्याला दडपण्यासाठी विद्यार्थी आणि विद्यार्थिनींवर दबाव टाकला जात असून त्यांच्यावर लाठीमार करण्यात येत आहे. या कारवाईचे पडसाद आता संपूर्ण देशात आणि महाराष्ट्रातही उमटत असल्याचे त्यांनी सांगितले. राज ठाकरे यांनी भाजपला त्यांच्याच पूर्वीच्या भूमिकेची आठवण करून दिली. विरोधी पक्षात असताना भाजपने अनेक मंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी केली होती, असे सांगत त्यांनी २६/११ हल्ल्यानंतर तत्कालीन गृहमंत्री आर. आर. पाटील यांच्या राजीनाम्याचा तसेच मुंबईचे तत्कालीन पोलीस आयुक्त अरूप पटनायक यांच्याविरोधातील आंदोलनाचा उल्लेख केला.

# लाठी ऐवजी संवाद साधा

## अण्णा हजारेंचे मोदींना आवाहन



युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर- दिल्लीतील जंतर-मंतर येथे सुरू असलेल्या विद्यार्थी आंदोलनादरम्यान झालेल्या पोलिसांच्या लाठीमाराच्या घटनेचे देशभर तीव्र पडसाद उमटत आहेत. या पार्श्वभूमीवर ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना खरमरीत पत्र लिहून लोकशाहीत संवादाला प्राधान्य देण्याचे आवाहन केले आहे. आंदोलनकर्त्यांवर बळाचा वापर करण्याऐवजी त्यांच्या मागण्यांवर सकारात्मक चर्चा करून मार्ग काढावा, अशी भूमिका त्यांनी पत्रातून मांडली आहे. तसेच या घटनेचा निषेध आण्णा हजारे यांनी अहिल्यानगर येथे गांधी स्मारक समोर एक दिवसाचे मौन धारण केले आहे.

अण्णा हजारे यांनी पत्रात म्हंटले आहे की, नवी दिल्लीतील आंदोलनादरम्यान घडलेल्या हिंसाचाराच्या आणि पोलिसी कारवाईच्या बातम्या अत्यंत वेदनादायक आहेत. लोकशाही व्यवस्थेत अशा प्रकारच्या घटना कोणाच्याही हिताच्या नाहीत. कोणत्याही परिस्थितीत हिंसा, सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान किंवा आंदोलनकर्त्यांवर अनावश्यक बळाचा वापर टाळला गेला पाहिजे, असे त्यांचे स्पष्ट मत आहे. त्यांनी पुढे नमूद केले की, देशातील लाखो तरूण पेपरफुटी, भरती प्रक्रियेतील विलंब, वाढती बेरोजगारी आणि इतर विविध प्रश्नांमुळे अस्वस्थ आहेत. या अस्वस्थतेकडे केवळ कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न म्हणून न पाहता, समाजातील वेदना आणि अपेक्षा म्हणून पाहण्याची गरज आहे. यापूर्वी २०२४ मध्ये नीट परीक्षेतील पेपरफुटी आणि गोंधळाची प्रकरणे समोर आली होती. (पान २)




छाया– विलास तुपे, राजूर

# भंडारदऱ्यात पावसाचे रौद्ररूप

## घाटघरमध्ये ३०५ मिमी विक्रमी पाऊस

युवावार्ता (प्रतिनिधी)

राजूर - भंडारदरा परिसरात पावसाने पुन्हा एकदा रौद्ररूप धारण केले असून गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे संपूर्ण आदिवासी पट्ट्यात जनजीवन विस्कळीत झाले आहे. डोंगररांगांवर दाट धुक्याची चादर पसरली असून, सोसाट्याच्या वाऱ्यासह कोसळणाऱ्या पावसाने संपूर्ण परिसर हादरून गेला आहे. डोंगरदऱ्यांमधील ओढे-नाले दुथडी भरून वाहत असून अनेक ठिकाणी पूरस्थिती निर्माण झाली आहे.

उडदावणे नदीला आलेल्या पुरामुळे शिंगणवाडीकडे जाणारा मुख्य रस्ता पाण्याखाली गेला आहे. काही गावांकडे जाणारे पूल आणि रस्तेही जलमय झाल्याने वाहतुकीवर परिणाम झाला आहे. प्रशासनाने नागरिकांना अत्यावश्यक कामाशिवाय घराबाहेर न पडण्याचे आवाहन केले आहे. जिल्ह्याची 'चेरापुंजी' म्हणून ओळख असलेल्या घाटघर येथे तब्बल ३०५ मिमी पावसाची विक्रमी नोंद झाली आहे. तर रतनवाडी येथे २४८ मिमी, पांजरे येथे १७६ मिमी आणि भंडारदरा येथे १७५ मिमी पाऊस झाला आहे. वाकीसह संपूर्ण घाटमाथ्यावर दिवसभर संततधार सुरू असून, थंड वारे आणि धुक्यामुळे वातावरणात कमालीचा गारवा पसरला आहे.

गुरुवारी सकाळी सहा वाजेपर्यंत भंडारदरा धरणातील पाणीसाठा ९,२१९ दलघफूट इतका झाला असून धरण ८३.५१ टक्के भरले आहे. दरम्यान, धरणाच्या पाणलोटात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे पाण्याची आवक वेगाने वाढत असून धरणाचा साठा ८५ टक्क्यांच्या उंबरठ्यावर पोहोचला आहे.

कळसुबाई शिखर परिसरातही मुसळधार पाऊस कायम असून वाकी धरण पूर्ण क्षमतेने ओसंडून वाहत आहे. त्यामुळे निळवंडे धरणातही मोठ्या प्रमाणावर पाण्याची आवक सुरू झाली आहे. गुरुवारी सकाळी सहा वाजता निळवंडे धरणात ३,५४२ दलघफूट पाणीसाठा नोंदविण्यात आला असून धरण ४२.५० टक्के भरले आहे.

पूरस्थितीमुळे काही प्रमाणात गैरसोय निर्माण झाली असली, तरी हा पाऊस बळीराजासाठी मोठा दिलासा ठरत आहे. अकोले तालुक्यातील भात खाचरे पाण्याने तुडुंब भरली असून, महिनाभरापूर्वी पाण्याअभावी चिंतेत असलेले शेतकरी आता जोमाने भात लागवडीच्या कामाला लागले आहेत. या मुसळधार पावसामुळे भंडारदरा व निळवंडे धरणांच्या पाणीसाठ्यात लक्षणीय वाढ होत असल्याने पाणलोटासह लाभक्षेत्रातील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

ADVANCE GOLD - SIP - SCHEME
गोल्ड एसआयपी योजना
गुंतवणूक फायद्याची बचत जास्तीची!
१० महिने रक्कम भरा आणि एक महिना बोनस मिळवा!
जमा झालेल्या रकमेच्या मजुरीवर 50% सूट
बुकिंग दिवसाच्या सोन्याच्या भावात खरेदी करा.
सोने । चांदी । हिरे
अशोक चौक, संगमनेर
फोन : 02425-225924
मो : 9372012044
OM MAYUR JEWELLERS
ओममयूर ज्वेलर्स
आपुलकीने यावे विश्वासाने न्यावे

विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल
आला रे आला राजपाल सेल आला..!
30% - 70% डिस्काउंट सेल
खरेदीवर आकर्षक गिफ्ट
जुने दिपाली फर्निचर, बस स्टँड समोर, नारायणगाव
संगमनेर (02425) 222226 | अ.नगर (0241) 2999299 | नारायणगाव (02132) 242132

PBM Jewellers
मे.पोपट भगिरथ महाले ज्वेलर्स (सराफ)
भव्य मंगळसूत्र महोत्सव
फक्त आपल्या लाडक्या PBM ज्वेलर्स मध्ये
यामध्ये नवनवीन डिझाईन् आणि व्हरायटीचे मंगळसूत्र त्याच प्रमाणे
जुन्या 22 कॅरेट सोन्याच्या एक्सचेंज वर 0% घट
अशोक चौक, गुंडेचा हॉस्पिटल समोर,चावडी जवळ, संगमनेर
7599996999/ 8265036807

Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा
अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
माफक दरात - संगमनेर येथेच
105 बेड्स
तज्ञ डॉक्टर्स
अत्याधुनिक सुविधा
कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध
हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग
सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33
पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर
एकत्रित आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
9953299532
आजच संपर्क करा
24/7 Emergency Services

# इनरव्हील क्लब ऑफ संगमनेरचा पदग्रहण सोहळा उत्साहात

## 'Grow & Flourish – वाढा आणि बहारा' या संकल्पनेतून समाजोपयोगी उपक्रमांचा संकल्प





युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : इनरव्हील क्लब ऑफ संगमनेरचा सन २०२६-२७ चा पदग्रहण समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमास डिस्ट्रिक्ट सेक्रेटरी नेत्रा भक्कड या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. तसेच माजी नगराध्यक्षा दुर्गाताई तांबे व डिस्ट्रिक्ट पास्ट ट्रेझरर तथा नगरसेविका रचना मालपाणी यांची विशेष उपस्थिती लाभली.

यावेळी वैशाली चोपडे यांनी अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारली. त्यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात Grow Flourish (वाढा आणि बहारा) ही वर्षाची संकल्पना मांडत, सर्व सदस्यांना सोबत घेऊन क्लबची सदस्यसंख्या वाढविणे आणि समाजोपयोगी उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्याचा संकल्प व्यक्त केला. तसेच युवा कौशल्य विकास, मुलींची सुरक्षितता व सक्षमीकरण, आनंद शाळा, व्यसनमुक्ती, पर्यावरण संवर्धन आणि अर्थसाक्षरता या विषयांवर वर्षभर विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती दिली.

यावेळी नवीन कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली. उपाध्यक्ष- दीपमाला भोत, सचिव - अश्विनी ढोले, खजिनदार- प्रियांका शहा, आयएसओ- अश्विनी राठी, संपादक - सप्तसिंधू खोसे, सीसी- ममता पोफळे आणि क्लब ई-ॲडमिन- पूजा हासे यांची नियुक्ती करण्यात आली.

यावर्षी प्रथमच इनरव्हील क्लब ऑफ संगमनेरने सोशल मीडियावर अधिकृत प्रवेश करत आपले कार्य इन्स्टाग्राम, फेसबुक आणि इनरव्हीलच्या अधिकृत संकेतस्थळावर नियमितपणे प्रसिद्ध करण्यास सुरुवात केली. हा क्लबसाठी महत्त्वाचा टप्पा ठरला असून, यासाठी क्लब ई-ॲडमिन पूजा हासे यांनी विशेष परिश्रम घेतल्याबद्दल त्यांचा विशेष गौरव करण्यात आला.

यावेळी डिस्ट्रिक्ट ई-ॲडमिन म्हणून निवड झालेल्या वैशाली खैरनार यांचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच रोटरी क्लब ऑफ संगमनेरचे अध्यक्ष समीर शाह व सचिव संकेत काजळे, लायन्स क्लब ऑफ संगमनेर सॅफ्रॉन सॅफायरचे अध्यक्ष जितेश लोढा व सचिव नम्रता आभंग तसेच रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२ चे सहाय्यक प्रांतपाल (Assistant Governor) आनंद हासे यांच्या नियुक्तीबद्दलही सत्कार करण्यात आले.

कार्यक्रमात सामाजिक बांधिलकी जपत विविध उपक्रमांचे उद्घाटन करण्यात आले. आधार फाउंडेशनच्या दोन मुलींच्या शिक्षणासाठी आर्थिक मदतीचा धनादेश सुपूर्द करण्यात आला. तसेच आनंदवन शाळेतील १० गरजू विद्यार्थ्यांना शालेय बॅग, कंपास बॉक्स व खाऊचे वाटप करण्यात आले. याशिवाय निंमगावजाळी येथील युवा महिला शेतकरी पूजा डेंगळे यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

यावर्षी क्लबमध्ये अनेक नवीन महिला सदस्यांचा समावेश करण्यात आला असून, त्यांच्या स्वागताने क्लबची ताकद अधिक वाढली आहे. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन सुनीता कोडे आणि सीमा अत्रे यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी वसुधा वाकचौरे, सोनम परदेशी, धनश्री हासे, महेश भुसाळ, राजेंद्र कुटे, संदेश चोपडे, धनंजय राहाणे, सार्थक शिंदे तसेच क्लबच्या सर्व माजी अध्यक्षा आणि सदस्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

प्रमुख पाहुण्या डिस्ट्रिक्ट सेक्रेटरी नेत्रा भक्कड यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणातून इनरव्हीलच्या सेवा, मैत्री आणि समाजहिताच्या कार्याचा गौरव करत नवीन कार्यकारिणीला शुभेच्छा दिल्या व समाजसेवेचे कार्य अधिक व्यापक करण्याचे आवाहन केले.

पान १ वरून

## लाठी ऐवजी...

यंदाही परीक्षेबाबत अनेक तक्रारी आणि निकाल प्रक्रियेबाबत गोंधळ झाल्याच्या बातम्या समोर आल्या आहेत. सरकारी यंत्रणेत. गैरव्यवहार उघडकीस आल्यास त्याची जबाबदारी केवळ कनिष्ठ अधिकाऱ्यांवर टाकणे योग्य नसून वरिष्ठांनाही जनतेप्रती उत्तरदायित्व स्वीकारावे लागते असे त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान या आंदोलनस्थळाला प्रतीकात्मक स्वरूपात नगरचे जंतर मंतर असे नाव देण्यात आले आहे. दिल्लीतील विद्यार्थ्यांच्या आंदोलनाच्या अनुषंगाने निर्माण झालेल्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर लोकशाही मूल्यांचे संरक्षण, विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांबाबत संवेदनशील भूमिका आणि संवादातून प्रश्न सोडविण्याची आवश्यकता अधोरेखित करण्यासाठी हे मौन धरणे आयोजित करण्यात आले आहे.

# एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये शुक्रवारपासून दोन दिवसीय 'डिव्हाईस क्लोजर' शिबीर

## जन्मजात हृदयविकार असलेल्या बालकांवर होणार मोफत उपचार



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - जन्मजात हृदयविकारग्रस्त म्हणजेच हृदयाला छिद्र असलेल्या बालकांसाठी येत्या शुक्रवारी (दि. २४) आणि शनिवारी (दि. २५) एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये मोफत हृदयविकार उपचार शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती एसएमबीटी हार्ट इन्स्टिट्यूटचे संचालक डॉ. गौरव वर्मा यांनी दिली. राष्ट्रीय बाल स्वास्थ्य उपक्रमाअंतर्गत हृदयविकार आढळलेल्या बालकांवर एसएमबीटी रुग्णालयात पूर्णपणे मोफत उपचार केले जातात. दरमहा आयोजित होणाऱ्या या विशेष शिबीरांच्या माध्यमातून आतापर्यंत अडीच हजारांहून अधिक बालकांवर यशस्वी हृदयोपचार करण्यात येथील तज्ज्ञांना यश आले आहे.

लहान मुलांमध्ये जन्मजात हृदयरोगाचे प्रमाण मोठे असून दर हजार जन्मांमागे हे प्रमाण ६ ते १२ टक्के आढळते. भारताच्या जन्मदराचा विचार करता दरवर्षी सुमारे १.५ लाखांपेक्षा जास्त बालके 'कन्जनायटल हार्ट डिसीज' घेऊन जन्माला येतात. लहान मुलांमधील आजारांमध्ये बालहृदयरोगाचा क्रमांक वरचा असला, तरी यावर उपचार करणाऱ्या तज्ज्ञ डॉक्टरांची आजही मोठी कमतरता भासते. ग्रामीण भागातील रुग्णांना उपचारासाठी जिल्ह्याच्या ठिकाणी किंवा मुंबईसारख्या मोठ्या शहरांत जावे लागते. हा त्रास कमी करण्यासाठी एसएमबीटी हॉस्पिटलने पुढाकार घेतला असून गेल्या दोन वर्षांत १,५०० हून अधिक शिबीरे आयोजित करून हजारो बालकांवर मोफत उपचार केले आहेत.

दूध पिताना किंवा खेळताना बाळ लवकर थकणे, खूप घाम येणे, वयाच्या मानाने वजनात अपेक्षित वाढ न होणे, वारंवार सर्दी, खोकला किंवा फुफ्फुसाचे संसर्ग (न्युमोनिया) होणे, ओठ, जीभ, नखे किंवा त्वचा निळसर पडणे (सायनोसिस), श्वास घेताना त्रास होणे किंवा धाप लागणे आणि हृदयाचे ठोके अत्यंत जलद चालणे या प्रमुख लक्षणांचा समावेश होतो. अशी लक्षणे आढळणाऱ्या रुग्णांनी या शिबिरात भेट देऊन डॉक्टरांचा मोफत सल्ला आणि मार्गदर्शन घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

दर महिन्याच्या शेवटच्या शनिवार आणि रविवारी बालहृदय विकारांवर विशेष लक्ष केंद्रित करून उपचार केले जातात, ज्यामध्ये 'डिव्हाईस क्लोजर' उपचारांचाही समावेश आहे. शासकीय योजनांशी संलग्न असलेल्या एसएमबीटी चॅरिटेबल हॉस्पिटलमध्ये सर्व मोफत वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून दिल्या जात असल्याने, शुक्रवारी आणि शनिवारी होणाऱ्या या दोन दिवसीय शिबीराचा जास्तीत जास्त गरजूंनी लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे. बालकांमध्ये हृदयाशी संबंधित काही लक्षणे आढळल्यास पालकांनी तात्काळ हॉस्पिटलशी संपर्क साधावा.

# कामगारांसाठी आरोग्य, आर्थिक संरक्षण आणि सामाजिक सुरक्षेचे मजबूत कवच




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - कर्मचारी राज्य विमा महामंडळ (ईएसआयसी) ही योजना केवळ वैद्यकीय उपचारापुरती मर्यादित नसून कामगार आणि त्यांच्या कुटुंबाला आरोग्य, आर्थिक सहाय्य आणि सामाजिक सुरक्षा देणारी सर्वसमावेशक योजना आहे. ईएसआयसी अंतर्गत कॅशलेस उपचार, आजारपण भत्ता, कामावरील किंवा कामावर येता जाता अपघात झाला तर आर्थिक मदत, कायमस्वरूपी अपंगत्व पेन्शन, आश्रितांना पेन्शन, बेरोजगारी भत्ता तसेच मुलांच्या शिक्षणासाठी विशेष सुविधा उपलब्ध असल्याची माहिती ईएसआयसी कार्यालय सिन्नर येथील मुख्य लिपिक जयराम इंगळे यांनी मालपाणी उद्योग समूहातील फास्ट ट्रॅक पॅकर्स प्रा. ली. व डि. जे.मालपाणी प्रा.ली. या ठिकाणी कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन कार्यक्रमात दिली.

मालपाणी उद्योग समूहाचे कार्यकारी संचालक रमेश घोलप, कामगार नेते कॉ माधवराव नेहे, प्रोसेस विभाग प्रमुख देवदत्त सोमवंशी, ईएसआयसी कार्यालयाचे व्यावस्थापक रविंद्र सांबारे, एच आर प्रमुख रविंद्र कानडे, राहुल शेरमाळे, नानासाहेब राउत, अर्चना मिश्रा- शुक्ला, अजित माताडे व्यासपीठावर उपस्थित होते.

पुढे बोलताना त्यांनी म्हटले की कामगारांनी ईएसआयसीमध्ये स्वत:सह कुटुंबातील सदस्यांची नावे, जन्मतारीख आणि आधार क्रमांक अद्ययावत ठेवणे आवश्यक आहे. त्यानंतर ईएसआयसीच्या डॉक्टरांकडून तपासणी करून आवश्यक असल्यास मान्यताप्राप्त रुग्णालयात रेफर केले जाते. या रुग्णालयांमध्ये कॅशलेस पद्धतीने उपचार उपलब्ध होतात. आपत्कालीन परिस्थितीत इतर रुग्णालयात उपचार घेतल्यास नियमानुसार आवश्यक कागदपत्रे सादर करून लाभ मिळू शकतो.

ईएसआयसीमध्ये योगदान कालावधी आणि लाभ कालावधी निश्चित असतो. पात्रता पूर्ण करणाऱ्या कर्मचाऱ्यांना आजारपणाच्या काळात 'सिकनेस बेनिफिट' स्वरूपात आर्थिक मदत दिली जाते. कॅन्सर, क्षयरोग, मूत्रपिंडाचे गंभीर आजार, हृदयविकार यांसारख्या गंभीर आजारांसाठी मेडिकल बोर्डाच्या शिफारशीनुसार वाढीव आजारपण भत्ता आणि दीर्घकालीन उपचाराची सुविधा उपलब्ध आहे. कामाच्या ठिकाणी अपघात झाल्यास तातडीने उपचार, शस्त्रक्रिया आणि पुनर्वसनाची व्यवस्था ईएसआयसीमार्फत केली जाते. अपघातामुळे कायमस्वरूपी अपंगत्व आल्यास मेडिकल बोर्ड अपंगत्वाचे प्रमाण निश्चित करून कर्मचाऱ्याला आयुष्यभरासाठी अपंगत्व पेन्शन मंजूर करते. नियमांनुसार या पेन्शनमध्ये वाढही होऊ शकते आणि कर्मचारी नंतर दुसऱ्या नोकरीत गेल्यानंतरही पात्रतेनुसार हा लाभ सुरू राहू शकतो. कामाच्या ठिकाणी अपघातात कर्मचाऱ्याचा मृत्यू झाल्यास त्याच्या पत्नी, मुलांसह पात्र आश्रितांना ईएसआयसीकडून मासिक आश्रित पेन्शन दिली जाते. त्यामुळे कुटुंबाला आर्थिक आधार मिळतो आणि सामाजिक सुरक्षा सुनिश्चित होते.

# संत साहित्याची संगत : जीवन धन्य करणारा आनंदाचा मार्ग



आपल्या जीवनाची खरी धन्यता संतसंगतीत आहे. ही संतसंगती अनुभवण्याची सुवर्णसंधी पंढरीच्या पालखी सोहळ्यात मिळते. वारकऱ्यांच्या मुखी हरिनाम, हातात टाळ-मृदुंग आणि अंत:करणात विठ्ठलावरील अखंड श्रद्धा असते. हीच संतपरंपरेची खरी ओळख आहे.

संतांनी आपल्या विचारांचा अमूल्य ठेवा संत साहित्याच्या रूपाने आपल्यासाठी उपलब्ध करून दिला आहे. चैतन्य महाराज देगलूरकर आपल्या प्रवचनात सांगतात, आज जरी संत ज्ञानेश्वर महाराज किंवा संत तुकाराम महाराज प्रत्यक्ष भेटत नसले, तरी ज्ञानेश्वरी आणि तुकारामांची गाथा आपल्या हातात आहे. हे ग्रंथ म्हणजेच संतांचे सजीव स्वरूप आहे.

ज्ञानेश्वरी आणि गाथा हे दोन्ही ग्रंथ आनंदाचे कंद आहेत. ते भक्ती आणि ज्ञान यांचे अद्वितीय ऐक्य घडवतात. हे ग्रंथ केवळ धार्मिक नव्हे, तर जीवन जगण्याची दिशा देणारे आहेत. त्यातून मनाला समाधान, सकारात्मकता, आत्मविश्वास आणि आत्मिक शांती मिळते.

आजच्या काळात माणसाला प्रत्येक गोष्टीची तक्रार करण्याची सवय लागली आहे. छोट्या-छोट्या अडचणींनी तो खचून जातो. मात्र ज्ञानेश्वरीतील दोन ओव्या किंवा गाथेतील दोन अभंग जरी मनापासून वाचले, तरी मनाला विलक्षण शांतता लाभते आणि जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलतो.

पालखी सोहळ्यातील वारकऱ्यांकडे पाहिले की याची प्रचिती येते. ते घरापासून पंढरपूरपर्यंत शेकडो किलोमीटर पायी चालतात. चालताना पायाला फोड येतात, चप्पल तुटते, ताप येतो, डोके दुखते. छोट्या तंबूमध्ये झोपावे लागते. ना पंखा, ना गादी, ना एसी, ना इतर सुखसोयी. अनेकदा मुसळधार पावसात हातावर भाकरी घेऊन जेवावे लागते. तरीही त्यांच्या चेहऱ्यावर तक्रार नसते.

उलट ते आनंदाने म्हणतात, गैरसोय हीच आमची सोय आहे. ही मानसिक आणि आध्यात्मिक ताकद त्यांना संत साहित्याच्या अभ्यासातून मिळते. कारण संत साहित्य हा त्यांच्या जगण्याचा श्वास असतो.

अलीकडे एका वृत्तवाहिनीवर वारीत सहभागी झालेल्या एका वृद्ध महिलेची मुलाखत प्रसारित झाली होती. तिला विचारण्यात आले, वारीला येऊन तुम्हाला काय मिळते? त्यावर ती सहज म्हणाली, मला आनंद मिळतो.

पुढे तिला विचारले, तुम्हाला भीती वाटत नाही का? त्यावर ती म्हणाली, मी ठीक आहे. मला कोणाचीच भीती नाही. माझ्याबरोबर विठ्ठल आहे. माझे पाय दुखत नाहीत आणि मला कोणतीही तक्रार नाही. कारण मला संतसंगती लाभली आहे.

हीच संत साहित्याची खरी ताकद आहे. संत साहित्य वाचणे म्हणजे संतांशी संवाद साधणे होय. त्यातून ज्ञान, समाधान, सकारात्मकता, सदाचार, भक्ती आणि मन:शांती प्राप्त होते. संत साहित्य आपल्या विचारांना शुद्ध करते, आचरण घडवते, अहंकाराचा नाश करते आणि आत्मिक उन्नतीचा मार्ग दाखवते.

संत नामदेव महाराज म्हणतात -<br>
संत संगतीचे काय सांगू सुख ।<br>
आपणा पारिखे नाही जेथे ।।

संतांच्या संगतीत मिळणारे सुख शब्दांत व्यक्त करता येत नाही. प्रत्येक संत आपल्या आयुष्यात आईच्या भूमिकेत उभा राहतो. त्यांच्या साहित्यामध्ये दु:खावर मात करण्याचे, संकटात धैर्य देण्याचे आणि जीवनाला योग्य दिशा देण्याचे विलक्षण सामर्थ्य आहे.

वारकरी वर्षभर संत साहित्याचा अभ्यास करतात आणि त्याच अभंगांचा गजर करत विठ्ठलाच्या दर्शनासाठी पंढरीची वाट धरतात. त्यामुळे त्यांची वारी ही केवळ प्रवास नसून आत्मशुद्धीचा आणि आनंदप्राप्तीचा सोहळा ठरते.

आज प्रत्येकाने स्वत:ला एक प्रश्न विचारण्याची गरज आहे-परिस्थितीसमोर हतबल व्हायचे, की संत साहित्याची संगत धरून जीवन आनंदी, समाधानी आणि अर्थपूर्ण बनवायचे?

संत साहित्याची संगत आयुष्य खऱ्या अर्थाने सोपे, सुंदर आणि धन्य करते.

**प्रा. शशांक गंधे, संगमनेर**<br>
**मो. ९८९०१६३६४२**

# कट्टा गँग आणि ट्रम्पतात्या...




कट्टा गँगचे सदस्य घाईघाईत बाळूच्या हॉटेलमध्ये शिरले. प्रकाश, सुनील, किरण, संतोष, सुभाष,सतीश आणि अर्जुन हे या कट्टा गँग चे सदस्य. कोपऱ्यातील टेबल गाठून कट्टा गँग ने ऑर्डर सोडली - बाळू, गरमागरम पाच प्लेट वडापाव आण. आणि त्यानंतर मस्त गरम गरम चहा.

बाळु मान हलवत म्हणाला - होय साहेब.

प्रकाशने सिगारेट सुलगावली. हवेत धूर सोडत तो म्हणाला - च्यायला, ट्रम तात्या लय डेंजर मॅन. त्याच्या डोक्यात एकदा शिरलं की तो काय करल याचा नेम नाही.

सतिश - बरं मग-

प्रकाश - अरे ट्रम्प तात्यांनी इराणं वर हल्ला केलाय. ट्रम्प तात्याची आणि इराणची आता चांगलीच जुम्पलीय. कोणीच माघारी घ्यायला तयार नाही.

सतीश - बरं मग. (कोणी काही बोललं की सतिशची सवय बरं मग)

किरण- बरं मग काय? इथं जग बंद पडायची वेळ आलीय. रोज चमचमीत, तेलकट खायची सवय झालीय. पण तेलामुळं आपला वडापाव सुद्धा महाग झालाय. सगळीकडे भाव वाढलेत. गरिबाचा नाश्ता सुद्धा आता खिशाला परवडत नाही.

सुभाष - रोज घरी मिळमिळीत भाजी खाऊन लय कटाळा आलाय. बायको भाजीत तेल कमी वापरतिया. पार चवच यिना बघ जीभला. बायको म्हणती - ज्यादा तेल खाऊ नका तेल लई महाग झालंय. आणि तब्येतीला बी ते चांगलं नाय.

संतोष - घरात गॅस संपला होता. कुठेच गॅस मिळत नव्हता. गॅसच्या दुकानात लांबच लांब रांगा होत्या. रांगेमध्ये भांडण चालू होती. बरेच जण कामाला दांडी मारून गॅस साठी रांगेत उभे होते. गॅस काही मिळत नव्हता. शेवटी पाचशे रुपये ज्यादा भरून गॅस घरी आणला. तवा कुठे बायकोची बडबड बंद झाली.

सुनिल - गॅसच काय घेऊन बसला. गावात कुठच पेट्रोल मिळत नव्हतं. सगळे पेट्रोल पंप बंद होते. दोन दिवस लय हाल झाले. काल पेट्रोलच्या रांगेत चार पाच तास उभा होतो तेव्हा कुठे पाचशे रुपयांच पेट्रोल मिळालं.

अर्जुन -अख्या शेअर मार्केटची वाट लावलीयं तात्यानं.ट्रम्प तात्या मनाला येइलं तसं वागतोय. आज एक बोलतोय. उद्या दुसरंच बोलतोय. माझं लय मोठं नुकसान झालं शेअर मार्केट मध्ये. तात्यानं लय मोठा गेम केलायं. बाळूनं कढईत तळलेले गरमागरम वडे प्लेटीत भरले. कट्टा गँगच्या समोर प्लेटी ठेवत बाळू म्हणाला खरंय, लई मोठा गेम केलाय ट्रम्प तात्यांनी. कट्टागँग बाळूकडे बघत जोर जोरात हसायला लागली.बाळूला पण हसू फुटलं.

कट्टा गँग एक सुरात म्हणाली -

च्यायला,बाळू तू सुद्धा?

बाळू - आपण सगळेच या युद्धाचे परिणाम भोगत आहोत. देव ट्रम्प तात्याला व ईराणला सदबुद्धी देवो. बाळुने त्याची फिलॉसॉफी ऐकवली. कट्टा गँगने वडापाव फस्त केला.चहा ढोसला.उधारी टिपायला सांगितली. गाडीचा धुरळा उडवत कट्टा गँग पसार झाली.

**मुकुंद कुलकर्णी**<br>
**मो. 8308270525**

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफ्रुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

We treat He cure's
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# अकोल्याच्या आदिवासी भागात अजितदादांची जयंती उत्साहात



युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - अकोले तालुक्यातील आदिवासी दुर्गम भागातही दिवंगत अजितदादा पवार यांची जयंती विविध कार्यक्रमांनी श्रद्धाभावाने साजरी करण्यात आली. शालेय विद्यार्थी, शिक्षक व पालकांनी त्यांच्या प्रतिमेस अभिवादन करून त्यांच्या कार्याला उजाळा दिला.

महाराष्ट्र शासनाने घेतलेल्या महत्त्वपूर्ण निर्णयानुसार दिवंगत अजितदादा पवार यांच्या जयंतीचा समावेश राष्ट्रपुरुष व थोर व्यक्तींच्या अधिकृत शासकीय जयंती कार्यक्रमांमध्ये करण्यात आला आहे. त्यानिमित्त तालुक्यातील विविध शैक्षणिक संस्थांमध्ये त्यांच्या कार्याचे स्मरण करण्यात आले.

श्री स्वामी समर्थ माध्यमिक विद्यालय, मवेशी येथे आयोजित कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी भजन सादर करत तसेच दोन मिनिटे स्तब्धता पाळून दिवंगत अजितदादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी त्यांच्या सामाजिक कार्याचा व जनसामान्यांप्रती असलेल्या योगदानाचा आढावा घेण्यात आला. कार्यक्रमात मुख्याध्यापिका मंजुषा काळे यांनी विद्यार्थ्यांना अजितदादा पवार यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन समाजसेवा, शिक्षण आणि मूल्याधिष्ठित जीवन जगण्याचे आवाहन केले. यावेळी कल्पना शिंदे, शोभा आव्हाड, अनिल नाईकवाडी आणि मच्छिंद्र देशमुख यांनीही मनोगत व्यक्त करत त्यांच्या कार्याचा गौरव केला. कार्यक्रमास शिक्षक, विद्यार्थी, पालक तसेच ग्रामस्थ उपस्थित होते. शांत, शिस्तबद्ध आणि प्रेरणादायी वातावरणात जयंती कार्यक्रम संपन्न झाला.

# पेपर लीक केससाठी फास्ट ट्रॅक कोर्ट बनवू - प्रंतप्रधान

## तुम्हीच मुलांचे भविष्य बरबाद केले - राहुल गांधी

जंतर-मंतरवर सुरू असलेल्या पेपरफुटी प्रकरणावरील आंदोलनादरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी द वर पोस्ट करून लिहिले की, पेपरफुटीच्या दोषींना शिक्षा देण्यासाठी फास्ट ट्रॅक कोर्ट्स स्थापन केले जातील. देशातील तरुणांचे हित आणि त्यांचे भविष्य ही आमची सर्वोच्च प्राथमिकता आहे. तरुणांच्या भविष्याशी खेळणाऱ्यांना सोडले जाणार नाही. यावर राहुल गांधींनी द वर पोस्ट करून म्हटले की, तुम्हीच तरुणांच्या भविष्याचे सर्वाधिक नुकसान केले आहे. तुम्ही शिक्षण व्यवस्था उद्ध्वस्त होऊ दिली आणि यासाठी जबाबदार असलेल्या व्यक्तींना संरक्षण दिले.

दिल्लीतील जंतर-मंतरवर २० जूनपासून कॉकरोच जनता पार्टी छएएढ पेपरफुटीनंतर शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करत आहे. २१ जुलै रोजी विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यासह अनेक विरोधी पक्षनेते दिल्लीतील पंतप्रधान निवासस्थानाबाहेर धरणे धरून बसले होते.देशात आतापर्यंत पेपरफुटीच्या प्रकरणांसाठी स्वतंत्र जलदगती न्यायालये नव्हती. अशा प्रकरणांची सुनावणी सामान्य न्यायालयांमध्ये होत असे, त्यामुळे निकाल येण्यासाठी अनेकदा अनेक वर्षे लागत असत. आता पंतप्रधानांनी पेपरफुटीच्या प्रकरणांसाठी जलदगती न्यायालये स्थापन करण्याची घोषणा केली आहे, जेणेकरून त्यांची सुनावणी आणि निकाल लवकर लागू शकेल. जलदगती न्यायालयांची कामगिरीही चांगली राहिली आहे. केंद्र सरकारच्या मते, बलात्कार आणि झजउडज प्रकरणांसाठी स्थापन केलेल्या जलदगती न्यायालयांनी २०१९ ते २०२५ या काळात ३.०६ लाखांहून अधिक प्रकरणांचा निपटारा केला आहे. या न्यायालयांचा निपटारा दर ९६.२८% आहे, म्हणजेच जेवढी नवीन प्रकरणे आली, तेवढ्याच प्रकरणांचा जवळपास निपटाराही झाला.

# मातोश्रींसमवेत दिंडीत रमले आ. खताळ



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -आषाढी वारीनिमित्त श्री विठ्ठलाच्या दर्शनासाठी पंढरपूरकडे प्रस्थान केलेल्या संगमनेर तालुक्यातील श्रीक्षेत्र माणकेश्वर आणि श्रीक्षेत्र बाळेश्वर पायी दिंडीसोहळ्यात आमदार अमोल खताळ यांनी आपल्या मातोश्रींसमवेत सहभाग नोंदविला. पंढरपूर तालुक्यातील भंडीशेगाव येथे त्यांनी गळ्यात टाळ, हातात वीणा घेऊन हरिनामाच्या अखंड गजरात वारकऱ्यांसोबत काही किलोमीटर पायी चालत विठ्ठलभक्तीचा आनंद अनुभवला.

आषाढी एकादशीनिमित्त महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून हजारो वारकरी दिंड्यांसह पंढरपूरच्या दिशेने मार्गस्थ झाले आहेत. त्यामध्ये संगमनेर तालुक्यातील श्रीक्षेत्र माणकेश्वर व श्रीक्षेत्र बाळेश्वर या दिंड्यांचाही उत्साहपूर्ण सहभाग आहे. शेकडो किलोमीटरचा पायी प्रवास करत विठुरायाच्या दर्शनासाठी निघालेल्या वारकऱ्यांमध्ये भक्तिभाव, समर्पण आणि उत्साह ओसंडून वाहत होता.

यावेळी आमदार खताळ यांनी दिंडीत सहभागी झालेल्या ज्येष्ठ वारकरी बांधवांची भेट घेत त्यांच्याशी संवाद साधला. गेल्या २७ वर्षांपासून अखंड पायी वारी करणाऱ्या आपल्या मातोश्रींसमवेत दरवर्षीप्रमाणे यंदाही काही अंतर पायी चालण्याचा योग साधला. हरिनामाच्या गजरात सहभागी होत त्यांनी वारकरी परंपरेतील समता, सेवा आणि भक्तीभावाचा अनुभव घेतला.

# अकोलेत युरिया खत उपलब्ध करून द्या व 'बफर स्टॉक' तातडीने खुला करा - ग्राहक पंचायत

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - अकोले आदिवासी भागामध्ये पावसाळयात खरिपाच्या हंगामात आवश्यक रासायनिक खतांचा तुटवडा निर्माण झाला आहे. ही व्यावसायिकांनी रासायनिक खतांची निर्माण केलेली कृत्रिम टंचाई आहे. याचा परिणाम सर्व सामान्य शेतऱ्यांना यूरिया खताची एकही गोणी मिळू शकत नाही. यामुळे अनेक आदिवासी शेतकरी खतांपासून वंचित आहेत. तातडीने शेतकऱ्यांना युरिया खत उपलब्ध करून द्यावित व शासनाच्या ताब्यात असलेल्या युरियाचा 'बफर स्टॉक' तातडीने खुला करण्याबाबतचे निवेदन ग्राहक पंचायत महाराष्ट्र जिल्हा उपाध्यक्ष मच्छींद्र मंडलीक, माधवराव तिटमे, सचिव राम रूद्रे, यांनी अकोले तालुक्याचे तहसिलदार डॉ. सिद्धार्थ मोरे यांना निवेदनाद्वारे मागनी करण्यात आली.



याबाबत दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की जुन,जुलै मध्ये झालेल्या अवकाळी व अतीवृष्टीच्या पावसाने शेतकरी राजा अगोदरच उध्वस्त झालेला आहे. तशातच तरीही अडचणीतून बी-बीयाने, पैशाची ऊसनवारी करून खरेदी करायला सुरुवात केली. भात लागवडीसाठी युरिया खताची गरज भासत आहेत खत न मिळाल्याने पेरण्यांमध्ये व भात लावणीस विलंब, उशीर होत आहे व सोयाबीन, भुईमूग, बाजरी, मका इतर, पिकासाठी शेतकऱ्यांना युरिया खताची अत्यंत गरज भासत आहे,तात्काळ युरिया खत उपलब्ध करून द्या 'बफर स्टॉक' तातडीने खुला करण्यात यावा. असे निवेदनात म्हटले आहे.

निवेदनावर ग्राहक पंचायतचे जिल्हा उपाध्यक्ष मच्छिंद्र मंडलीक, तालुका अध्यक्ष दत्ता शेनकर, कार्याध्यक्ष महेश नवले, सचिव राम रुद्रे, रामदास पांडे, अनंत घाणे, गंगाराम धिंदळे, मोहन मुंढे, सुरेश गबाले, दत्तात्रय मुठे, अशोक उघडे, पांडूरंग पथवे, रामदास पवार,राजेंद्र लहामगे, सुशांत वाकचौरे, साहेबराव दातखिळे, ओंकार धुमाळ, मुकेश बैरागी, नवनाथ आवारी,

भाऊसाहेब वाकचौरे, गणपत थिगळे, प्रदिप हासे, भाऊसाहेब वाळूंज, ड.राम भांगरे, ड.दिपक शेटे, रामहारी तिकांडे,ज्ञानेश्वर पुंडे, दत्ता शेटे, कैलास तळेकर आदींचे नावे आहे माहितीसाठी प्रति, जलसंधारण मंत्री राधाकृष्ण विखे पाटील तथा पालकमंत्री, अहिल्यानगर, जिल्हाधिकारी अहिल्यानगर, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी अहिल्यानगर, तालुका कृषि अधिकारी अकोले. यांना पाठविण्यात आल्या आहे.

# संतांचे संगती... आत्मज्ञानाची प्रगती

## जगद्गुरू संत तुकोबांचे भक्त बनलेले सुफी संत - अनघडशहा फकीर

वारकरी संप्रदायाच्या कीर्तनात ऐकवली जाणारी अनघडशहा फकिरांची कथा ही केवळ एक भेट नाही. ती तुकोबांच्या अथांग अधिकाराची आणि भक्तीच्या सीमेपलीकडच्या ऐक्याची साक्ष आहे.

कथेची सुरुवात होते संत तुकाराम महाराजांचे समकालीन विद्वान रामेश्वर भट्ट बहुलीकर यांच्यापासून. ते ज्ञानेश्वर माऊलींचे परम भक्त होते, पण सुरुवातीला तुकोबांच्या विरोधात होते.

एकदा प्रवासात असताना रामेश्वर भट्टांच्या अंगाचा अचानक दाह सुरू झाला. उन्हामुळे शरीर जळू लागले. वाटेत एक विहीर दिसली. ती विहीर त्या भागातील सिद्ध सुफी संत अनघडशहा फकिरांची होती. दाह शांत करण्यासाठी रामेश्वर भट्टांनी परवानगी न घेता त्या विहिरीत स्नान केले.

त्याचवेळी अनघडशहा तिथे आले. आपल्या विहिरीत ब्राह्मणाने न विचारता स्नान केले म्हणून त्यांना राग आला. रामेश्वर भट्टांनी नम्रपणे कारण सांगितले तरी फकिरांचा राग शांत झाला नाही. रागात त्यांनी शाप दिला, तुझ्या अंगाचा दाह कधीच शांत होणार नाही.

शापामुळे रामेश्वर भट्टांची जळजळ अधिक वाढली. ते व्याकुळ होऊन आळंदीला गेले आणि ज्ञानेश्वर माऊलींच्या समाधीपुढे धरणे धरले. माऊलींनी त्यांना दृष्टांत दिला. रामेश्वर, ज्या तुकोबांची तू निंदा करतोस, त्यांच्याच चरणी गेल्याशिवाय हा दाह जाणार नाही. तातडीने देहूला जा.

आदेशानुसार रामेश्वर भट्ट देहूला आले आणि तुकोबांच्या पाया पडले. तुकोबांनी त्यांच्यावर पाणी शिंपडले किंवा विठ्ठलाचे तीर्थ दिले. क्षणार्धात वर्षानुवर्षे न जाणारा दाह कायमचा थांबला.

ही वार्ता अनघडशहांपर्यंत पोहोचली. ज्या शापाने माणूस संपतो तो शाप एका साध्या माणसाने मोडला? ही गोष्ट त्यांच्या मनात खुपली. तुकाराम कोण आहेत हे पाहण्यासाठी ते देहूकडे निघाले.

वाटेत ते चिंचवडला आले. सिद्ध असल्याने ते नेहमीप्रमाणे भिक्षा मागत होते. त्यांनी मोरया गोसावींच्या घराण्यातील देवांकडे भिक्षा मागितली. देवांनी त्यांच्या कटोऱ्यात भरपूर अन्न घातले. पण अनघडशहांची सिद्धी अशी होती की कितीही घातले तरी कटोरा भरत नव्हता. रिकामाच राहिला.

पुढे ते देहूला पोहोचले. गावोगावी अल्लाह का बन्दा, एक



कटोरा भर दान म्हणत भिक्षा मागू लागले. लोकांनी पोत्याच्या पोत्या पीठ टाकले तरी कटोरा रिता.

असे फिरत फिरत ते तुकोबांच्या घरापाशी आले. तेव्हा तुकोबा घरी नव्हते. जिजाबाई घरात दळण दळत होत्या आणि लहान मुलगी खेळत होती. फकिराचा आवाज ऐकून मुलगी भिक्षा द्यायला गेली. तिने आईच्या पिठातून मूठभर पीठ घेतले. हे पाहून आधीच कष्टाने त्रस्त असलेल्या जिजाबाई संतापल्या. बापाने सर्व लुटवले, आता खायचे पीठ पण लुटवतेस का असे म्हणून तिच्या पाठीत तडाखा दिला.

घाबरून मुलीच्या हातातील बहुतांश पीठ खाली सांडले. तिच्या मुठीत फक्त नावापुरते पीठ राहिले. तिने तेच निरागसपणे अनघडशहांच्या कटोऱ्यात टाकले. आश्चर्य घडले. देवांचे अन्न आणि गावकऱ्यांचे पोते पीठ ज्याने भरले नाही तो कटोरा त्या एका छोट्या मूठभर पिठाने काठोकाठ भरला.

हा चमत्कार पाहून अनघडशहा जागीच स्तब्ध झाले. ज्या घरातील मुलगी आणि अन्न एवढे पवित्र आहे, त्या घराचा मालक किती मोठा असेल याची त्यांना जाणीव झाली. तुकोबांना भेटण्याची ओढ अधिकच वाढली.

भिक्षा घेऊन ते तुकोबांचा शोध घेत गावाबाहेर गेले. शेवटी देहूच्या वेशीबाहेर असलेल्या कापूर ओढ्याच्या काठावर त्यांची आणि संत तुकाराम महाराजांची भेट झाली.

तुकोबांचे शांत, साधे आणि विठ्ठलमय रूप पाहताच अनघडशहांचा अहंकार गळून पडला. ज्यांना त्यांनी शाप दिला होता त्यांनाच जीवन देणाऱ्या तुकोबांच्या चरणी ते नतमस्तक झाले. तिथून पुढे ते तुकोबांचे परम भक्त बनले. तुकोबांच्या अभंगात त्यांना ईश्वराचे दर्शन झाले.

आजही कापूर ओढ्याजवळ जिथे ही भेट झाली तिथे एक सुंदर स्मारक आहे. दर्ग्याच्या रूपातील तो ओटा वारकरी आणि सुफी दोन्ही परंपरेचा संगम सांगतो.

या भेटीचे महत्त्व आजही जिवंत आहे. दरवर्षी आषाढी वारीला तुकोबांची पालखी देहूहून निघते तेव्हा पहिला विसावा आणि पहिली आरती याच कापूर ओढ्यावरील अनघडशहांच्या स्मारकाजवळ होते. ही परंपरा शेकडो वर्षे अखंड चालली आहे.

या कथेतून एकच संदेश मिळतो. भक्तीला जात, धर्म, पंथाचे बंधन नाही. रामेश्वर भट्टांचा दाह तुकोबांनी शांत केला. अनघडशहांचा अहंकार तुकोबांच्या प्रेमाने विरघळला. आणि एका लहान मुलीच्या निरागस मूठभर पिठाने सिद्ध फकिराचा कटोरा भरला.

हाच तुकोबांचा महिमा आहे. शब्दांनी नव्हे तर आचरणाने आणि दयेने माणसे जिंकणारा महिमा. म्हणूनच अनघडशहा फकीर हे फक्त सुफी संत राहिले नाहीत, तर ते जगद्गुरू तुकारामांचे खरे भक्त झाले.



**संकलन, संतचरणरज...**

**श्री. सदाशिव रामनाथ मुळे**

(पुणे युवावार्ता, प्रतिनिधी), मो . ८६६८३२७१७४


सौजन्य - निजध्यास...

# अहिल्यानगर जिल्ह्यात अतिवृष्टीची शक्यता

## धरणांमधून पाण्याचा विसर्ग सुरू असल्याने नदीकाठच्या नागरिकांना सतर्कतेचे आवाहन

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - भारतीय हवामान विभागाने अहिल्यानगर जिल्ह्यात काही ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता वर्तविली आहे. जिल्ह्यातील धरणांमधून पाण्याचा विसर्ग सुरू असल्याने नद्यांच्या पाणीपातळीत वाढ होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी सतर्क राहून आवश्यक खबरदारी घ्यावी, असे आवाहन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे प्रभारी निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी सुभाष दळवी यांनी केले आहे.



भिमा नदीत दौंड पुलावरून १० हजार ९३८ क्युसेक, घोड नदीत घोड धरणातून ४ हजार क्युसेक, तर गोदावरी नदीत नांदूर मध्यमेश्वर धरणातून ४ हजार ७६९ क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरू आहे. अहिल्यानगर, पुणे आणि नाशिक जिल्ह्यांत मध्यम ते मुसळधार स्वरूपाचा पाऊस झाल्यास भिमा, घोड आणि गोदावरी नद्यांच्या पाणीपातळीत मोठी वाढ होऊ शकते. तसेच जिल्ह्यातील भंडारदरा, निळवंडे आणि मुळा धरणांच्या पाणलोट क्षेत्रात पाऊस सुरू असून धरणांमध्ये पाण्याची आवक होत आहे. त्यामुळे गोदावरी, भिमा, घोड, प्रवरा आणि मुळा नदीकाठच्या नागरिकांनी तसेच धरण परिसरात पर्यटनासाठी येणाऱ्या नागरिकांनी विशेष खबरदारी घ्यावी.

मेघगर्जना, वीज चमकणे अथवा वादळी वारे सुरू असताना झाडाखाली, मोकळ्या मैदानात, टॉवर, ध्वजस्तंभ, विजेचे खांब, धातूचे कुंपण किंवा रोहित्राजवळ थांबू नये. लोंबकळणाऱ्या वीजवाहिन्या किंवा केबलपासून सुरक्षित अंतर ठेवावे. अशा वेळी कोणत्याही विद्युत उपकरणांचा वापर टाळावा. मोकळ्या जागेत अडकल्यास सुरक्षेसाठी गुडघ्यावर बसून हातांनी कान झाकावेत व डोके दोन्ही गुडघ्यांच्या मध्ये ठेवावे. ट्रॅक्टर, शेतीची अवजारे, दुचाकी तसेच इतर विद्युत सुवाहक वस्तूंपासून दूर राहावे. जाहिरात फलक कोसळून दुर्घटना घडण्याची शक्यता असल्याने त्यांच्या आजूबाजूला थांबू नये. धरण परिसरात अथवा नदीपात्रात पर्यटनासाठी जाणाऱ्या नागरिकांनी पाण्यात उतरू नये तसेच धोकादायक ठिकाणी सेल्फी अथवा छायाचित्र घेऊ नये. नदी, ओढे व नाल्यांच्या पाणीपातळीत वाढ होत असल्यास सुरक्षित स्थळी स्थलांतर करावे. पुलांवरून पाणी वाहत असल्यास ते ओलांडण्याचा प्रयत्न करू नये.

अतिवृष्टीमुळे भूस्खलन व दरडी कोसळण्याची शक्यता असल्याने डोंगराच्या पायथ्याशी राहणाऱ्या नागरिकांनी वेळीच सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे. या काळात घाट रस्त्यांवरील प्रवास शक्यतो टाळावा. जुन्या, मोडकळीस आलेल्या व धोकादायक इमारतींमध्ये आश्रय घेऊ नये. वादळी वारे, वीज आणि पावसापासून स्वतःचे तसेच जनावरांचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक ती दक्षता घ्यावी. नागरिकांनी स्थानिक प्रशासनाने वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे पालन करून सुरक्षित स्थळी जावे.

कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी नजीकच्या पोलीस ठाणे किंवा तहसील कार्यालयाशी संपर्क साधावा. तसेच मदतीसाठी जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर येथील जिल्हा नियंत्रण कक्षाच्या ०२४१-२३२३८४४, ०२४१-२३५६९४० या दूरध्वनी क्रमांकांवर किंवा ११२ आणि १०७७ या टोल फ्री क्रमांकांवर संपर्क साधावा.

## संपादकीय...

# केंद्र सरकार कॉक्रोच आंदोलन हाताळण्यात अपयशी ?

मोदी सरकारकडून आंदोलन जरा हलक्यातच घेतले गेले. खरतर या आंदोलनात प्रत्यक्ष नीट पिडीत विद्यार्थी होते का नाही ते माहीत नाही. पण जेंव्हा नीट पेपरफुटीचे प्रकरण समोर आले तेंव्हा फक्त पेपरफुटीला जबाबदार कोण आणि त्यांचा शोध व अटक यावरच लक्ष केंद्रित केले गेले. परत परीक्षाही सुरळीत झाली व शांततेने पार पडली. या काळात काही विद्यार्थ्यांनी या कारणावरून आत्महत्याही केल्या. अर्थात त्या का केल्या हे थोडेसे अनाकलनीय आहे. एक परीक्षा झाली पण पेपर फुटल्याने पुन्हा होणार आहे हे माहीत असूनही आत्महत्या झाल्या. ही वस्तुस्थिती आहेच. सरकारकडून या आत्महत्या करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांना भेटण्यासाठी तातडीने काही पावले उचलायला हवी होती. पण त्याकडे दुर्लक्ष केले गेले. यातूनच संताप व असंतोष वाढला. किमान संबंधित खात्याच्या मंत्र्यांनी पत्रकार परिषद घेऊन माफी मागणे आवश्यक होते. ( हे घडले का ते मला नक्की माहीत नाही. ) आत्महत्याग्रस्त विद्यार्थ्यांच्या पालकांना दिलासा तसेच तातडीची आर्थिक मदत देणे आवश्यक होते.

अमेरिकेतून येऊन एक सोशल इन्फ्लूएन्सर इथे आंदोलन करणार याची पूर्वकल्पना सरकारला होती. पण सोशल मिडिया या नव्या जेन झी वर एवढा प्रभाव टाकू शकेल याचा अंदाज केंद्र सरकारला आला नाही. त्यात अनेक राज्यात व देशात निवडणूकात पराभूत झालेले अनेक विरोधी पक्ष याचा काय फायदा घेऊ शकतात याचाही अंदाज केंद्र सरकारला आला नाही. एरवी मनकी बात मधून प्रत्यक्ष विद्यार्थ्यांशी संवाद साधणारे आदरणीय मोदीजी यात अपयशी ठरले. परदेशातील दौऱ्यांवर जाऊन इथले मंत्री परिस्थिती हाताळतील असा त्यांचा विश्वास फेल गेला. गेली काही वर्ष सत्तेपासून वंचित व भाजपाच्या वाढत्या प्रभावाने निस्तेज होत चाललेल्या विरोधी पक्षांना मात्र हे आंदोलन संधी देणारे वाटले.

आपल्याकडे बांगलादेश किंवा नेपाळ सारखी परिस्थिती होणार नाही कारण आपली युवा पिढी तशी नाही या भ्रमात भाजपा राहिला. जरी पोलीस व इतर संरक्षण असले तरी असे आंदोलन हाताळताना ते संवेदनशील असल्याने परिस्थिती हाताळण्यावर निश्चितच मर्यादा येतात. त्यात सोनम वांगचुक व अनेक फिल्मी सेलिब्रिटीज आल्याने आंदोलनाला बळ आले पण त्याचे गांभीर्य ओळखण्यात गृह खाते निश्चितच कमी पडले.

उपोषण लांबत गेल्याने कोर्टाला हस्तक्षेप करावा लागला. उपोषणाने प्रकृती चिंताजनक होऊ शकेल यासाठी दवाखान्यात दाखल करण्याचे आदेश दिले गेले मात्र तिथेच पहिली ठिणगी पडली. इथे जर एखाद्या केंद्रीय मंत्र्यांनी येऊन निदान उपोषण सुरु झाल्यावर चार आठ दिवसानी बोलणी सुरु केली असती तर आंदोलनाची धग कमी झाली असती अर्थात आंदोलन हे खरंच विद्यार्थी प्रश्नासाठी होत की काही छुपा अजेंड्यावर चालल होत याचा विचार सुज्ञांनी करावा. पण यापूर्वीसुद्धा अण्णा हजारे यांचा वापर करुन दिल्लीची सत्ता कशी मिळवली गेली हे अलिकडेच घडलेले उदाहरण समोर असताना केंद्र सरकारकडून अशी बेफिकीरी का केली गेली हे अनाकलनीय आहे. जर शत्रू राष्ट्रांकडून व काही पाश्चिमात्य देशाकडून याला फंडींग होतय अशी माहिती जर केंद्र सरकारकडे होती (तशा बातम्या आल्यात किंवा तशी चर्चा आहे) मग यावर पूर्वीच ठोस कारवाई का झाली नाही? हे ही कोडेच आहे. पार संसदेपर्यंत आंदोलक पोचतात , मग नड्डा बोलायला येतात हे तहान लागल्यावर विहीर खणण्यासारखेच नाही का ? या आंदोलनाने व्यवस्थेविषयी अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत.

विरोधकांना केंद्र सरकारने आयतेच कोलीत दिले आहे. दोन तृतीयांश बहुमत सिद्ध होईलही पण निदान ही विधेयके तरी विरोधक मांडू देतील का ? की नेहमीप्रमाणेच गोंधळ करुन वारंवार कामकाज बंद पाडण्यात येईल असच सध्या तरी दिसतय. एकंदरीत झुरळ हा महागात पडणार अशीच चिन्ह सध्या तरी दिसतायत. त्यामुळेच अनेक भावी पंतप्रधान खूश असतील यात शंकाच नाही.

**प्रा. डॉ. अनंत दिवेकर**
**संगमनेर, मो. ९८८१९६६९९१**

# अकोलेत उबाठाचे निषेध आंदोलन

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले- ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ सोनम वांगचुक यांच्या दिल्लीतील जंतर-मंतर येथे सुरू असलेल्या आंदोलनाच्या समर्थनार्थ शिव-सेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या अकोले तालुक्याच्या वतीने मंगळवारी अगस्ती महाविद्यालयासमोर रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. त्यानंतर पोलिस ठाण्यावर मोर्चा काढून पोलिस निरीक्षक संदीप कोळी यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

या आंदोलनात जिल्हाप्रमुख जगदीश चौधरी, तालुकाप्रमुख महेश नवले, विधानसभा प्रमुख माधवराव तिटमे, उपजिल्हाप्रमुख

प्रभाकर फापाळे, शहरप्रमुख नितीन नाईकवाडी यांच्यासह पदाधिकारी, शिवसैनिक आणि विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. आंदोलनादरम्यान केंद्र सरकारने सोनम वांगचुक यांच्यावर केलेल्या कारवाईचा निषेध करण्यात आला. तसेच नीट परीक्षेच्या कथित गैरव्यवहाराच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी करण्यात आली. निवेदनात लोकशाहीत विरोधी पक्ष व आंदोलकांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांची दखल सरकारने घ्यावी, अशी भूमिका मांडण्यात आली. यावेळी विधानसभा प्रमुख

माधवराव तिटमे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या धोरणांवर टीका केली. तर तालुकाप्रमुख महेश नवले यांनी केंद्र सरकारच्या कार्यपद्धतीचा निषेध व्यक्त केला.

दिल्लीतील जंतर-मंतर परिसरातील आंदोलकांवर पोलिसांनी बळाचा वापर केल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला. आंदोलनानंतर पोलिस निरीक्षक संदीप कोळी यांना मागण्यांचे निवेदन देऊन संबंधित मागण्यांवर केंद्र सरकारने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली.

**SUBSCRIBE DAINIK YUVAVARTA YOUTUBE CHANNEL**

**Daily Yuvavarta**

दैनिक युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता

# संत ज्ञानेश्वर माऊली विद्यालयात पालक-शिक्षक मेळावा उत्साहात



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांचा शारीरिक, बौद्धिक, सामाजिक, भावनिक आणि सांस्कृतिक विकास घडविण्यासाठी शाळेमध्ये विविध उपक्रम राबविले जातात. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देणारे हे प्रेरणादायी उपक्रम त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी महत्त्वाचे ठरतात. जीवनाचा भक्कम पाया शाळेच्या मैदानावर तयार होत असल्याने खेळाचेही विद्यार्थ्यांच्या आयुष्यात अनन्यसाधारण महत्त्व आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हेच शाळेचे खरे ध्येय असल्याचे प्रतिपादन मा. प्राचार्य डॉ. नारायण जाधव यांनी केले.

ते श्री संत ज्ञानेश्वर माऊली विद्यालय, नान्नज दुमाला येथे आयोजित पालक-शिक्षक मेळाव्यात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी व्यासपीठावर मुख्याध्यापक एच. आर. सोनवणे, पालक प्रतिनिधी तुषार फड, स्थानिक स्कूल समितीचे सदस्य पांडुरंग फड व सुभाष वारुंक्षे, प्राथमिक आरोग्य उपकेंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. जयंत सूर्यवंशी, उद्योजक विलास वारुंक्षे, ज्ञानेश्वर गायकवाड, ज्ञानेश्वर ढोणे आदी मान्यवर उपस्थित होते.

मेळाव्यात विद्यार्थ्यांची शालेय शिस्त, शैक्षणिक गुणवत्ता, नियमित उपस्थिती, अभ्यासातील अडचणी, विशेष मार्गदर्शन वर्ग तसेच सराव चाचण्यांबाबत पालकांशी सविस्तर चर्चा करण्यात आली.

# अभंगांच्या सुरांनी रंगणार आषाढी

संगमनेर ( प्रतिनिधी ) आषाढी एकादशीच्या निमित्ताने संगमनेर शहरात सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात संगीत महाविद्यालयाच्या वतीने के बी दादा सभागृहामध्ये शुक्रवार दिनांक २४ जुलै २०२६ रोजी सायंकाळी सहा वाजता अभंग व भक्ती गीतांचा अभंग वाणी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. आषाढी वारीचे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासात मोठे महत्त्व असून मोठ्या उत्साहाने आनंदाने सर्व भाविक हा उत्सव साजरा करत असतात. या निमित्ताने सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात संगीत महाविद्यालयाच्या वतीने आषाढी एकादशीच्या पूर्वसंध्येला अवघा रंग एक झाला हा अभंग व भक्ती संगीताचा कार्यक्रम होणार आहे.

शुक्रवार दिनांक २४ जुलै २०२६ रोजी सायंकाळी सहा वाजता सह्याद्री महाविद्यालयाच्या के.बी.दादा सभागृहामध्ये हा कार्यक्रम होणार असून यावेळी काँग्रेस पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात,माजी आमदार डॉ.सुधीर तांबे, सौ.दुर्गाताई तांबे, आमदार सत्यजित तांबे, डॉ.जयश्रीताई थोरात, सौ.कांचनताई थोरात यांच्यासह संगमनेर मधील विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत. ह.भ.प. विनोद राऊत सर व सौ.स्वप्नाली राऊत व त्यांचे चाळीस विद्यार्थी विविध अभंग सादर करणारा असून त्यांना सत्यजित सराफ, गणेश गोरडे, सौरभ रणधीर, वैभव पवार, अवधूत काळे, नानासाहेब गुंजाळ हे संगीत साथ देणार आहेत. तर संत साहित्याचे अभ्यासक प्रा. विठ्ठल शेवाळे कार्यक्रमाचे निवेदन करणार आहेत.

तरी या अभंग व भक्ती गीतांच्या कार्यक्रमासाठी संगमनेर शहर व तालुक्यातील सर्व भाविक भक्त युवक नागरिक व रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात महाविद्यालय संगीत महाविद्यालय प्राचार्य डॉ बाळासाहेब वाघ, प्रा. विनोद राऊत यांनी केले आहे.

मा. तहसीलदार,
तहसील कार्यालय, अकोले
अकोले जि. अहिल्यानगर

विषय - जन्म नोंदणीचा दाखला मिळणे बाबत
अर्जदार,- श्री. अरुण यशवंत गुंजाळ
रा. खांडगाव, जि. अहिल्यानगर

वरील विषयानूसार अर्ज करतो की, माझा जन्म दि. ०७/०२/१९६५ रोजी उंचखडक खुर्द या. अकोले जि. अहिल्या नगर या गावी झाल्याची नोंद आपल्या दप्तरी झालेली असून माझी महसूल नोंदी नूसार जन्म नोंद दिनांक ०७//११/६५ आढळून येत असल्याने हिच नोंद ग्राह्य धरून सदर कागदपत्रांमध्ये दुरुस्ती करून माझे नाव अरुण यशवंत गुंजाळ नावाने जन्म दाखला मिळावा ही विनंती.

आपला विश्वासू
(श्री. आरूण यशंवत गुंजाळ)
रा. खांडगाव, ता. संगमनेर, जि. अ.नगर
मो. नं. ९९२२९४६६०७

**CHANGE IN NAME**

**I HAVE CHANGED MY OLD NAME IS**
TAMBOLI KAUSHAR ILIYAS

**NEW NAME AS**
KAUSAR MOSIN TAMBOLI

ADDRESS- GALLI NO 7, JAMJAM COLONY
TAL- SANGAMNER 422605

**तातडीने वॉचमन पाहिजे**

**चालू बिल्डिंग साईटसाठी विश्वासू व जबाबदार वॉचमन पाहिजे**

ठिकाण: संगमनेर,
वेळ: सकाळी ८ ते संध्याकाळी ७
– संपर्क –
**८८८८१४६६६१**

## जिल्हा वक्फ अधिकारी कार्यालय

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, अहिल्यानगर
पत्ता:- सुरभी हॉस्पिटल जवळ कविजंग लॉन्सच्या शेजारी अहिल्यानगर- छत्रपती संभाजीनगर हायवे अहिल्यानगर-४१४००३
Website: www.mahawakf.com Dwoahilyanagar@mahawakf.com

संचिका क्र. ADR/275
क्र. वक्फ/अहिल्यानगर/चौकशी/ 146 /2026
दिनांक - 20/07/2026

**(जाहिर प्रगटन)**

उम्मीद अधिनियम १९९५ च्या कलम ६९ अन्वये वक्फ संस्थेच्या योग्य प्रशासनाकरीता योजना मंजूर करणेबाबत.

वक्फ संस्थेच नाव व पत्ता: Husaini Madrasa Talimul Quran and Masjid, At. Kolhe wadi Road, Sangamner, Tq. Sangamner, Dist. Ahilyanagar

उपरोक्त वक्फ संस्था महाराष्ट्र राज्य मंडळात क्र. MSBW/ADR/541/2021 अन्वये नोंदणीकृत असून अर्जदार अलताफ उमराव शेख व इतर यांनी दि. १२/०५/२०२६ रोजीच्या अर्जान्वये सदर संस्थेच्या व्यवस्थापनाकरीता महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडे प्रारुप योजना दाखल केलेली आहे. प्रारुप योजनेतील तरतूदीनुसार विश्वस्तांचा कार्यकाळ पाच (५) वर्षाचा असून व्यवस्थापन समिती निवडीची रित उर्वरित व्यवस्थापकीय समिती सदस्यांच्या बहुमताने नवीन सदस्याची निवड करण्यात येईल. योजनेमध्ये नमूद प्रस्तावित व्यवस्थापन समिती खालीलप्रमाणे आहे:-

| अ. क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १ | अलताफ उमराव शेख | अध्यक्ष |
| २ | मतीन हसनखान पठाण | उपाध्यक्ष |
| ३ | पठाण मुबीन खान मोहम्मद खान | सचिव |
| ४ | सादिक महंमद हुसेन मणियार | खजिनदार |
| ५ | पठाण फारूख खान मोहम्मद खान | सदस्य |
| ६ | सादिक मोहम्मद खान पठाण | सदस्य |
| ७ | अब्दुल हकीम अब्दुल माबुद मणियार | सदस्य |

सदर पारुप योजनेबाबत काही तक्रारी, आक्षेप असल्यस संबंधितांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ दिवसाच्या आत. जिल्हा वक्फ अधिकारी कार्यालय, अहिल्यानगर पत्ता-सुरभी हॉस्पिटल जवळ कविजंग लॉन्सच्या शेजारी अहिल्यानगर- छत्रपती संभाजीनगर हायवे अहिल्यानगर ४१४००३ येथे आपले म्हणणे दाखल करावे. विहीत वेळेनंतर आक्षेप प्राप्त झाल्यास त्याची दखल घेण्यात येणार नाही. याची दक्षता घ्यावी.

जिल्हा वक्फ अधिकारी
अहिल्यानगर

**पाहिजेत**

श्रद्धा क्लिनिक आणि पंचकर्म सेंटर
रिसेप्शनिस्ट – १ (महिला)
वेळ – सकाळी ९ ते ५
ताजणे मळा, प्रभात मेडिकल समोर, संगमनेर
**8080548282**
**7498749500**

**नावात बदल**

माझे जुने नाव शेख सरवर सलीम असून आधार कार्डवर नवीन नाव आलिम सलीम शेख असून हे नाव ग्राह्य धरावे. दोन्ही नावाची व्यक्ती एकच आहे.
आलिम सलीम शेख
रा. संगमनेर, जि. अ.नगर

**छोट्या जाहिरातीसाठी संपर्क करा**
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०

**पाहिजेत**

पेट्रोल पंप वर 2 कर्मचाऱ्यांची पदभरती करायची असून, इच्छुक असणाऱ्या उमेदवारांनी कृपया संपर्क करावा.
**चैतन्य पेट्रोलियम**
संगमनेर बायपास पुणे - नाशिक हायवे, घुलेवाडी, ता. संगमनेर
– संपर्क –
**8888808397**

**फॅकल्टी पाहिजे** अगस्ती अकॅडमी संगमनेर

ऑनलाइन / ऑफलाइन अभ्यासक्रम
**पशुधन पर्यवेक्षक भरती कोर्स**
पशुवैद्यकीय विज्ञानातील पदविका (Diploma) किंवा पदवी (Degree) आवश्यक.
**AMVI – 461 जागा MPSC**
(सहायक मोटार वाहन निरीक्षक)
यांत्रिक अभियांत्रिकी (Mechanical Engineering) मधील पदवी आवश्यक.
पत्ता : नाशिक – पुणे हायवे, संचित बिल्डिंग, पहिला मजला महाराष्ट्र बँकेच्या वरती, संगमनेर - ४२२६०५
- संपर्क -
**6005401510**







**पाहिजेत**

**घरकामासाठी होतकरू महिला कामगार पाहिजे**
वेळ ३ ते ७ मालदाड रोड
डॉ. शेवाळे हॉस्पिटल, विद्यानगर, संगमनेर
**9822304638**

**फ्लॅट विकणे आहे**

**2 BHK फ्लॅट विकणे आहे नवीन बांधकाम, स्वतंत्र पार्किंगसह**
ठिकाण: वृंदावन हाईट्स, चंद्रशेखर चौक, संगमनेर
– संपर्क –
**8788945208**
**8208223721**

**पाहिजेत**

**राजवीर फार्मा**
मेडीकल एजन्सी कामाकरिता फक्त गरजुंनी संपर्क साधावा
मार्केटिंग – १ जागा
दुकानकामासाठी – ०२
रविवार सुट्टी असते
आकर्षक पगार व बोनस
ठिकाण– जाणता राजा रोड, मुथुट फासनान्स पाठीमागे, २ नं गल्ली, संगमनेर
**8669184141**

**पाहिजेत**

**जानकीराम गंगाधर काजळे ज्वेलर्ससाठी**
सेल्स एक्झीक्युटिव्ह -४
मार्केटिंग एक्झीक्युटिव्ह -४
हेल्पर - २
मेन रोड, संगमनेर
**7588249849**

## दिनविशेष

२०१९: बोरिस जॉन्सन — युनायटेड किंगडमचे ७७वे पंतप्रधान बनले.
२०००: विजयालक्ष्मी सुब्रह्यण्यम — ह्या भारताच्या पहिला महिला ग्रँडमास्टर बनल्या.
१९९७: महाश्वेतादेवी — यांना रॅमन मॅगसेसे पुरस्कार जाहीर.
१९८७: हुल्डा क्रुक्स — यांनी वयाच्या ९१ व्या वर्षी जपान मधील सर्वोच्च शिखर माउंट फुजीवर चढाई केली. त्या सर्वात वयोवृद्ध व्यक्ती ठरल्या.
१९७७: लिबिया-इजिप्शियन युद्ध — समाप्ती.
१९६९: अपोलो प्रोग्राम — अपोलो ११ अंतराळयान प्रशांत महासागरात सुरक्षितपणे खाली पडले.
१९६९: अपोलो ११ — चंद्र मोहिमेनंतर हे अंतराळयान पृथ्वीवर सुखरूप परतले.
१९४३: दुसरे महायुद्ध — ऑपरेशन गोमोरा: सुरू झाले, नोव्हेंबरमध्ये ऑपरेशन संपेपर्यंत किमान ३० हजार हुन अधिक लोकांचे निधन.
१९४३: दुसरे महायुद्ध — ऑपरेशन गोमोरा: दोस्त राष्ट्रांनी जर्मनीतील हॅम्बर्ग शहरावर तुफानी बॉम्बहल्ले सुरू केले.

## जन्म

१९६९: जेनिफर लोपेझ — अमेरिकन अभिनेत्री, गायिका आणि नर्तिका
१९४७: जहीर अब्बास — पाकिस्तानी फलंदाज
१९४५: अझीम प्रेमजी — विप्रो कंपनीचे संस्थापक अध्यक्ष — पद्म विभूषण, पद्म भूषण
१९३७: मनोज कुमार — भारतीय अभिनेते, दिग्दर्शक, निर्माते — पद्मश्री, दादासाहेब फाळके पुरस्कार, राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार
१९२८: केशुभाई पटेल — गुजरातचे १०वे मुख्यमंत्री (निधन: २९ ऑक्टोबर २०२० )
१९११: पन्नालाल घोष — बासरीवादक संगीतकार (निधन: २० एप्रिल १९६० )
१८९७: अमेलिया इअरहार्ट — अटलांटिक महासागर एकट्याने पार करणाऱ्या पहिल्या महिला वैमानिक (निधन: ५ जानेवारी १९३९ )
१८५७: हेन्रिक पॉन्टोपिडन — डॅनिश पत्रकार आणि लेखक — नोबेल पुरस्कार (निधन: २१ ऑगस्ट १९४३ )
१८५१: फ्रेडरिक शॉटकी — जर्मन गणितज्ञ
१७८६: जोसेफ निकोलेट — फ्रेंच गणितज्ञ संशोधक

## मृत्यू

२०२०: अमला शंकर — भारतीय नृत्यांगना (जन्म: २७ जून १९१९ )
२०१७: हर्षिदा रावल — भारतीय गुजराती पार्श्वगायिका
२०१२: रॉबर्ट लिडले — सीटी स्कॅनचे शोधक (जन्म: २८ जून १९२६ )
१९८०: पीटर सेलर्स — इंग्लिश विनोदी अभिनेते आणि गायक (जन्म: ८ सप्टेंबर १९२५ )
१९८०: उत्तम कुमार — बंगाली व हिंदी चित्रपट अभिनेते (जन्म: ३ सप्टेंबर १९२७ )
१९७४: सर जेम्स चॅडविक — ब्रिटिश पदार्थवैज्ञानिक — नोबेल पुरस्कार (जन्म: २० ऑक्टोबर १८९१ )
१९७०: पीटर दि नरोन्हा — भारतीय उद्योगपती (जन्म: १९ एप्रिल १८९७ )
११२९: शिराकावा — जपानी सम्राट (जन्म: ७ जुलै १०५३ )




## दररोज थोडा अभ्यास.. यशाकडे एक नवे पाऊल!

स्पर्धा परीक्षा, विद्यार्थी आणि ज्ञानप्रेमी वाचकांसाठी दैनिक युवावार्ताचा हा विशेष उपक्रम. या सदरामध्ये दररोज दिनविशेष, जयंती, पुण्यतिथी, ऐतिहासिक घटना, महत्त्वाच्या व्यक्तींची माहिती, सामान्य ज्ञान व स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त तथ्ये संक्षिप्त आणि अभ्यासपूर्ण स्वरूपात प्रकाशित करण्यात येतील.

**24 जुलै**

## चंद्र मोहिमेनंतर पृथ्वीवर सुखरूप परतलेले ऐतिहासिक अंतराळयान




१९६९ हे वर्ष मानवाच्या अंतराळ संशोधनाच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाचे वर्ष ठरले. अमेरिकेच्या अंतराळ संशोधन संस्था नासाने (NASA) राबवलेल्या अपोलो ११ या मोहिमेद्वारे प्रथमच मानवाने चंद्राच्या पृष्ठभागावर यशस्वीपणे पाऊल ठेवले. ही मोहीम केवळ अमेरिकेसाठी नव्हे, तर संपूर्ण मानवजातीसाठी एक ऐतिहासिक घटना होती.अपोलो ११ हे अंतराळयान १६ जुलै १९६९ रोजी अमेरिकेतील केनेडी स्पेस सेंटर येथून प्रक्षेपित करण्यात आले. या मोहिमेत तीन अंतराळवीर सहभागी झाले होते — नील आर्मस्ट्राँग, एडविन "बझ" ऑल्ड्रिन आणि मायकेल कॉलिन्स. यापैकी नील आर्मस्ट्राँग आणि बझ ऑल्ड्रिन यांनी चंद्राच्या पृष्ठभागावर उतरून तेथे संशोधन केले, तर मायकेल कॉलिन्स यांनी कमांड मॉड्यूलमधून चंद्राभोवती भ्रमण करत मोहिमेला सहकार्य केले.२० जुलै १९६९ रोजी अपोलो ११ च्या लूनर मॉड्यूलमधून नील आर्मस्ट्राँग यांनी चंद्रावर पहिले पाऊल ठेवले. त्यांचा हा क्षण जगभरातील कोट्यवधी लोकांनी दूरचित्रवाणीवर पाहिला. त्यांनी मानवाच्या प्रगतीचे प्रतीक ठरणारे ऐतिहासिक शब्द उच्चारले — "मानवासाठी हे एक छोटे पाऊल आहे, पण मानवजातीसाठी ही एक मोठी झेप आहे." त्यानंतर बझ ऑल्ड्रिन यांनीही चंद्रावर उतरून विविध प्रयोग केले आणि चंद्राच्या पृष्ठभागाचे नमुने गोळा केले.मोहिमेतील सर्वात मोठे आव्हान म्हणजे अंतराळवीरांना सुरक्षितपणे पृथ्वीवर परत आणणे हे होते. चंद्रावरील काम पूर्ण केल्यानंतर अंतराळवीरांनी पृथ्वीच्या दिशेने प्रवास सुरू केला. २४ जुलै १९६९ रोजी अपोलो ११ चे कमांड मॉड्यूल प्रशांत महासागरात यशस्वीपणे उतरले. त्यानंतर अमेरिकेच्या नौदलाने तिन्ही अंतराळवीरांची सुरक्षित सुटका केली.अपोलो ११ मोहिमेचे यश हे विज्ञान, तंत्रज्ञान आणि मानवी धैर्याचा विजय मानले जाते.

## भारतीय उद्योगविश्वातील उद्योजक -पीटर दि नरोन्हा

**पुण्यतिथी विशेष**

पीटर दि नरोन्हा हे भारतातील प्रसिद्ध उद्योगपती आणि उद्योजकांपैकी एक म्हणून ओळखले जातात. १९७० च्या दशकात भारतीय उद्योग क्षेत्रात वेगाने बदल होत असताना त्यांनी व्यवसाय, व्यवस्थापन आणि औद्योगिक विकासाच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांच्या कार्यामुळे भारतीय उद्योगजगतामध्ये नवीन विचारसरणी आणि आधुनिक व्यवस्थापन पद्धतींना चालना मिळाली.पीटर दि नरोन्हा यांचा जन्म गोव्यातील कॅथोलिक कुटुंबात झाला. शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी उद्योग क्षेत्रात प्रवेश केला. व्यवसायातील दूरदृष्टी, मेहनत आणि नवकल्पनांचा स्वीकार या गुणांमुळे त्यांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. त्या काळात भारतीय अर्थव्यवस्था परवाना पद्धती, सरकारी नियंत्रण आणि मर्यादित औद्योगिक संधींमधून जात होती. अशा परिस्थितीत उद्योग उभारणे हे मोठे आव्हान होते.त्यांनी उद्योग व्यवस्थापन, उत्पादन क्षमता वाढवणे आणि ग्राहकांच्या गरजेनुसार व्यवसाय विकसित करण्यावर भर दिला. भारतीय बाजारपेठेतील बदलत्या गरजा ओळखून त्यांनी उद्योग क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञान आणि व्यावसायिक दृष्टिकोन आणण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या कामामुळे अनेक तरुण उद्योजकांना प्रेरणा मिळाली. कर्मचाऱ्यांचे कौशल्यवर्धन, गुणवत्तापूर्ण उत्पादन आणि ग्राहकांचा विश्वास संपादन करण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न



केले. उद्योगातील स्पर्धेला सकारात्मक दृष्टीने स्वीकारून त्यांनी नावीन्यपूर्ण उपक्रम राबवले आणि दीर्घकालीन विकासावर भर दिला.१९७० च्या दशकात भारतात औद्योगिकीकरणाला वेग येत होता. या काळात पीटर दि नरोन्हा यांच्यासारख्या उद्योजकांनी रोजगार निर्मिती, उत्पादन वाढ आणि आर्थिक विकासामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली. उद्योग हा केवळ नफा कमावण्याचा मार्ग नसून समाजाच्या प्रगतीचे साधन आहे, असा त्यांचा दृष्टिकोन होता.त्यांच्या कार्यशैलीत शिस्त, प्रामाणिकपणा आणि व्यवस्थापन कौशल्य यांना विशेष महत्त्व होते. त्यांनी उद्योग क्षेत्रात निर्माण केलेली विश्वासार्हता आणि योगदान आजही स्मरणात आहे.पीटर दि नरोन्हा यांचे नाव भारतीय उद्योगविश्वातील कर्तृत्ववान व्यक्ती म्हणून घेतले जाते. त्यांच्या प्रयत्नांनी भारतीय उद्योजकतेला नवी दिशा दिली आणि पुढील पिढीतील उद्योजकांसाठी प्रेरणादायी उदाहरण निर्माण केले.

## पानोडी - शिबलापूर-आश्वी रस्त्याची दुरवस्था

### वर्षभर रखडलेल्या कामामुळे नागरिकांचा संताप, अपघातांची मालिका सुरूच



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - तालुक्यातील पानोडी-शिबलापूर-अश्वी हा अत्यंत महत्त्वाचा संपर्कमार्ग गेल्या दीड वर्षांपासून रखडलेल्या कामामुळे अक्षरशः मृत्यूचा सापळा बनला आहे. रस्त्याचे काम अत्यंत संथ गतीने सुरू असल्याने नागरिक, विद्यार्थी, शेतकरी आणि वाहनचालकांना दररोज जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे. प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे परिसरात तीव्र संतापाची लाट उसळली आहे.

सध्या सुरू असलेल्या पावसामुळे रस्त्यावर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडले असून त्यात पाणी साचत असल्याने खड्ड्यांचा अंदाजच येत नाही. परिणामी दुचाकीस्वारांचे वाहन घसरणे, चारचाकी वाहनांचे नुकसान होणे आणि वारंवार अपघात होण्याचे प्रकार नित्याचे झाले आहेत. शाळा व महाविद्यालयात जाणाऱ्या विद्यार्थ्यांना दररोज जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत असून पालकांमध्येही भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, या रस्त्यावरील अपघातांमध्ये अनेक जण जखमी झाले असून काहींना जीवही गमवावा लागला आहे. तरीदेखील संबंधित ठेकेदार आणि सार्वजनिक बांधकाम विभागाकडून कामाला अपेक्षित गती दिली जात नसल्याने संतप्त नागरिकांनी प्रशासनाच्या निष्क्रियतेवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

या रस्त्याच्या दुरवस्थेबाबत ग्रामस्थांनी अनेकदा निवेदने देऊन तसेच पाठपुरावा करूनही परिस्थितीत कोणताही ठोस बदल झालेला नाही. उलट दिवसेंदिवस रस्त्याची अवस्था अधिकच बिकट होत असल्याने नागरिकांच्या संयमाचा अंत होत आहे.

पानोडी-शिबलापूर-अश्वी मार्ग हा हजारो नागरिक, विद्यार्थी, शेतकरी आणि व्यापाऱ्यांच्या दैनंदिन प्रवासाचा महत्त्वाचा दुवा आहे. त्यामुळे प्रशासनाने तातडीने रस्त्याचे रखडलेले काम पूर्ण करावे, धोकादायक खड्डे त्वरित बुजवावेत, वाहतूक सुरक्षित करण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात आणि संबंधित ठेकेदाराची जबाबदारी निश्चित करावी, अशी जोरदार मागणी परिसरातील नागरिकांकडून करण्यात येत आहे.

आणखी किती अपघात आणि किती जीव गेल्यानंतर प्रशासन जागे होणार? असा संतप्त सवाल आता परिसरातील नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

## पान १ वरून - विद्यार्थ्यांवरील हल्ल्याच्या निषेधार्थ ...

रामहरी कातोरे ,पांडुरंग घुले, डॉ दानिश, नूर मोहम्मद शेख, अनुराधा आहेर, तुषार पानसरे, यांच्यासह दत्ता ढगे,छात्र भारतीचे विविध पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संगमनेर बस स्थानक येथे संगमनेरातील हजारो कार्यकर्ते एकत्र आले. तेथून छत्रपती शिवाजी महाराज व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांना अभिवादन करून चावडी मार्गे हा मशाल मोर्चा महात्मा फुले पुतळा येथे आला. यावेळी लोकनेते बाळासाहेब थोरात म्हणाले की, सोनम वांगचुक ही देशातील आदर्श व्यक्तिमत्व आहे त्यांचे २१ दिवसापासून जंतर-मंतरवर उपोषण सुरू आहे. त्यांचा आवाज हा सर्वसामान्य विद्यार्थ्यांचा आणि युवकांचा आवाज आहे. परंतु केंद्र सरकारला तो ऐकू येत नाही. केंद्र सरकारला सत्तेचा गर्व झाला आहे. हुकूमशाही पद्धतीने लाठी हल्ला करून अमानुषपणे विद्यार्थ्यांचे आंदोलन दडपण्याचा प्रयत्न त्यांनी केला

संसदेमध्ये काँग्रेस नेत्यांना बोलू दिले नाही. म्हणून खासदार राहुल गांधी व प्रियांका गांधी यांनी पंतप्रधानांच्या घरासमोर आंदोलन केले .अत्यंत अमानुषपणे त्यांची उचल बांगडी करण्यात आली. त्यांची धरपकड करण्यात आली. देशात लोकशाही संपुष्टात आणण्याचे काम सरकार करत आहे. जनतेचा आवाज दाबला जात आहे. आम्ही निवडणुका कशाही जिंकतो हा गर्व सरकारला झाला असून आता जनतेने हे सर्व हातात घेतले पाहिजे. न्यायालय, स्वायत्त संस्था, पत्रकारिता, राजकारणासाठी वापरल्या जात आहेत. युवकांचे भविष्य धोक्यात घातले जात आहे. जाती धर्माच्या नावावर राजकारण सुरू झाले आहे. पुढील काळात लोकशाही राहील की नाही ही चिंता निर्माण झाली आहे. महात्मा फुले यांच्या जीवनावरील फुले चित्रपट बंद करणारे हे लोक असून सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावरील मालिकाही त्यांनी बंद केली. जातीयवाद त्यांनी वाढवला आहे .

तर मा आ डॉ तांबे म्हणाले की, नीट पेपर फुटी हा मोठा भ्रष्टाचार आहे. केंद्र सरकार आणि मंत्र्यांमध्ये कोणतीही नैतिकता उरली नाही .तातडीने धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिला पाहिजे. विद्यार्थ्यांवर लाठी हल्ला होतो आहे. विद्यार्थी जखमी होत आहेत आणि पंतप्रधान एक शब्दही बोलत नाहीत. हे अत्यंत दुर्दैवी आहे. हुकूमशाही पद्धतीने विद्यार्थ्यांचे आंदोलन लोकशाहीची हत्या आहे..


## Tender Notice

**"Sahyadri Bahujan Vidya Prasarak Samaj, Sangamner "**

At.- Sangamner, Tal.-Sangamner, Dist.- Ahilyanagar.

Sealed Tender in B-1 Forms are invited from all interested registered and experienced contractor's for the following work.

| Name of the work | Estimated cost | Ernest Money | Time Limit | Cost of Blank Tender form |
|---|---|---|---|---|
| 1) Compound wall in Sr.- No.- 63 Sangamner Bk. | 45,00,000/- | 45,000/- | 1 Months | 1,000.00 |
| 2) Compound wall in Sr.- No.- 153/1 Shiblapur Tal-Sangamner | 12,00,000/- | 12,000/- | 1 Months | 1,000.00 |

Blank tender form are available at the office of **B. R. Consultants, Top Ten Imperial, 2ND Floor, Shop No.-S7, Nashik Road, Sangamner-422605. (Mo No.9822310924)** from Date. 24/07/2026 to 29/07/2026 at office hours except Saturday and Sunday.

Sealed tender are accepted at the office of **B. R. Consultants, Top Ten Imperial, 2ND Floor, Shop No.-S7, Nashik Road, Sangamner-422605.,** on Date 30/07/2026 up to 6.00PM.

All rights are reserved with management.

**Chairman/Secretary**
Sahyadri Bahujan Vidhya Prasarak Samaj.
Sangamner.


## माहेश्वरी महिला संघटनेची बैठक उत्साहात




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - अहिल्यानगर जिल्हा माहेश्वरी महिला संघटनेची पहिली कार्यकारिणी बैठक 'स्वर्णीम आरंभी' या नावाने संगमनेर येथे उत्साहात पार पडली. राष्ट्रीय कार्यसमिती सदस्या शैला कलंत्री यांनी महिलांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी ही संघटना वरदान ठरत असल्याचे सांगितले. अनुराधा मालपाणी व रचना मालपाणी यांनी उद्योजकता, शिस्त आणि समाजसेवेचे महत्त्व अधोरेखित केले.

जिल्हाध्यक्षा अनुराधा राठी यांनी महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले. जिल्हा सचिव रक्षा बूब यांनी कार्यअहवाल सादर केला, तर अचला झंवर यांनी आर्थिक अहवाल मांडला. संघटनेत सध्या ४०१ महिलांनी सभासदत्व स्वीकारले असून बैठकीस १६० महिलांची उपस्थिती होती.

यावेळी महिला उद्योजिकांना प्रोत्साहन देण्यासाठी १२ तालुक्यांतील उद्योजिकांच्या उत्पादनांचे विशेष प्रदर्शन भरविण्यात आले. तसेच ग्रामविकास समितीच्या वतीने महिलांना वृक्षारोपणासाठी रोपे भेट देण्यात आली. जानेवारी ते जुलै महिन्यात वाढदिवस असलेल्या सदस्यांचा सामूहिक सत्कार करण्यात आला. विविध सामाजिक उपक्रमांनी आणि महिलांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली.


HAPPY Birthday



**मा. श्री. के. के. थोरात**
चेअरमन, संगमनेर औद्योगिक वसाहत, संगमनेर



**मा. श्री. मधुसूदन करवा**
संचालक, करवा एजन्सी, संगमनेर



**मा. श्री. शांताराम आडेप**
व्यावस्थापक, कामगगार प्रेस



**मा. श्री. अनिल रोहम**
मॅनेजर, शारदा ग्रा. बि. शेती सह पतसंस्था, वाघापूर, ता. संगमनरे

दैनिक युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता

पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
ताम्हाणे हॉस्पिटल
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
आधुनिक उपचार पद्धती
● कमी वेदना, जलद बरे होणे
● लेझर व प्रगत तंत्रज्ञान
● अनुभवी तज्ञ डॉक्टरांचा सल्ला
● गोपनीयतेची पूर्ण काळजी
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०




SALE 25 TO 50 % OFF
लग्नबस्त्यासाठी खास व्यवस्था...
भंडारी
क्लॉथ सेंटर सिल्क अँड साडीज
मनासारखी खरेदी आणि भरपूर फायदा देणारा सेल
(संपूर्ण ए.सी. शोरुम)
मेनरोड कॉर्नर, बाजारपेठ, संगमनेर

# कारगिल विजय दिवसानिमित्त स्वराज्य सैनिक संघटनेचे देशभक्तिपर कार्यक्रमांचे आयोजन

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - कारगिल विजय दिवसानिमित्त रविवार, दि. २६ जुलै २०२६ रोजी सकाळी १० वाजता संगमनेर येथील मालपाणी लॉन्स येथे भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. स्वराज्य सैनिक कल्याण संस्था (महाराष्ट्र), संगमनेर व सर्व आजी-माजी सैनिक परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम होणार असून भारतीय सैन्याच्या शूर वीरांना कृतज्ञ अभिवादन करण्यात येणार आहे.



कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ८.३० वाजता कारगिल विजय रॅलीने होईल. ही रॅली छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते मालपाणी लॉन्स या मार्गावर काढण्यात येणार आहे. त्यानंतर वीरमाता व वीरपत्नी यांचा सन्मान, समाजभूषण पुरस्कार वितरण सोहळा तसेच देशभक्तीपर गीत, समूह नृत्य, समूहगीत आणि वेशभूषा अशा विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमास संगमनेर परिसरातील वीरमाता, वीरपत्नी तसेच सर्व आजी-माजी सैनिक परिवार प्रमुख उपस्थिती लावणार आहेत. कुछ याद उन्हें भी कर लो, जो लौट के घर न आए या भावस्पर्शी संदेशातून कारगिल युद्धात बलिदान देणाऱ्या शहीद जवानांना अभिवादन करण्यात येणार आहे. आयोजकांनी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून देशासाठी बलिदान देणाऱ्या वीर जवानांना आदरांजली अर्पण करावी, असे आवाहन केले आहे.

**दरम्यान यावेळी सामाजिक कार्यकर्ते डॉ. हरिभाऊ उगले यांना समाजभूषण पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.** अकोले तालुक्यातील डोंगरगावचे सामाजिक कार्यकर्ते डॉ. हरिभाऊ उगले यांनी गेली चार दशके स्वच्छता, मतदान जनजागृती, अंधश्रद्धा निर्मूलन, व्यसनमुक्ती आणि सर्पसंवर्धन या क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य केले आहे. संत गाडगे महाराजांच्या विचारांनी प्रेरित होऊन त्यांनी महाराष्ट्रातील हजारो गावांमध्ये स्वखर्चाने जाऊन स्वच्छता मोहीम राबवून स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले आणि समाजप्रबोधन केले. वयाच्या १७ व्या वर्षी शिक्षण सोडून शेती स्वीकारतानाच त्यांनी समाजसेवेचा वसा घेतला. आजपर्यंत १,५०० हून अधिक गावांमध्ये प्रत्यक्ष स्वच्छता अभियान राबवून शाळा, ग्रामपंचायती, स्मशानभूमी, मंदिरे आणि सार्वजनिक ठिकाणे स्वच्छ केली. यासोबतच मतदानाचे महत्त्व, अंधश्रद्धा निर्मूलन, व्यसनमुक्ती आणि पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती केली.

सर्पमित्र म्हणून त्यांनी हजारो सापांना सुरक्षित पकडून जंगलात सोडून जीवदान दिले. अनेक गरजू युवक-युवतींचे विवाह जुळवून दिले. एका गरीब मुलीचा विवाह स्वतःच्या खर्चाने लावून सामाजिक बांधिलकी जपली. अंधश्रद्धा निर्मूलनासाठी त्यांनी स्वतःच्या आयुष्यातही परिवर्तन घडवून आणले. वडिलांच्या निधनानंतर पारंपरिक कर्मकांड टाळून तो खर्च सामाजिक कार्यासाठी दिला. नवीन कपड्यांऐवजी जुने कपडे वापरत शैक्षणिक साहित्य वाटप व समाजोपयोगी कामांसाठी निधी खर्च करण्याची त्यांची भूमिका आजही कायम आहे.

त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेत केंब्रिज विद्यापीठाने त्यांना मानद डॉक्टरेट पदवी प्रदान केली आहे. ग्रामीण भागातील एका निस्वार्थी समाजसेवकाचा हा जागतिक स्तरावरील सन्मान समाजासाठी प्रेरणादायी ठरला आहे.

# लेकीच्या प्रेमातून साकारला 'वैशाली फॉल'

## अकोलेतील पांजरे गावाचा निसर्गरम्य ठेवा



छायाचित्र : विलास तुपे, राजूर

युवावार्ता (प्रतिनिधी)

राजूर - अकोले तालुक्यातील पांजरे गावात पावसाळ्यात फेसाळत कोसळणारा 'वैशाली फॉल' हा केवळ एक धबधबा नाही, तर तो एका वडिलांच्या आपल्या लेकीवरील अपार प्रेमाचे जिवंत स्मारक आहे. सुमारे ७० फूट लांब आणि १० फूट उंच असलेला हा देखणा धबधबा पाहताना निसर्गाच्या कुशीत एखादे सुरेल संगीत घुमत असल्याचा भास होतो.

गावातील शेतकरी लक्ष्मण सयाजी उघडे यांनी जन्मतः दिव्यांग असलेल्या आपल्या लाडक्या मुलगी वैशालीच्या चेहऱ्यावर आनंद फुलावा, या एकाच भावनेतून हा धबधबा साकारला. डोंगरातून येणाऱ्या पाण्याचा योग्य वापर करून त्यांनी आपल्या शेतात हा कृत्रिम धबधबा उभारला. त्याच्या शुभ्र जलधारा पावसाळ्यात दिमाखात कोसळताना पाहणाऱ्यांना जणू छोटेखानी 'नायगरा फॉल'चीच अनुभूती मिळते.

हा धबधबा उभारण्यासाठी तब्बल दोन महिन्यांचे परिश्रम घ्यावे लागले. या कामात गावकऱ्यांनीही उत्स्फूर्त सहभाग घेतला. आज हा धबधबा पांजरे गावाच्या सौंदर्यात भर घालणारे आकर्षण ठरला असून, परिसरातील नागरिक आणि पर्यटकांचे लक्ष वेधून घेत आहे.

पांजरे गावापासून अगदी हाकेच्या अंतरावर असलेला 'वैशाली फॉल' निसर्गसौंदर्याबरोबरच माणुसकी, प्रेम आणि जिव्हाळ्याची हृदयस्पर्शी कहाणी सांगतो. प्रत्येक कोसळणाऱ्या जलधारेत एका वडिलांचे आपल्या लेकीवरील निस्सीम प्रेम दडलेले आहे. त्यामुळे हा धबधबा केवळ पर्यटनस्थळ नसून, संवेदनांचा आणि प्रेमाचा अविस्मरणीय ठेवा बनला आहे.

कै.श्री.निवृत्ती लहानू पा.गोर्डे
भावपूर्ण श्रद्धांजली
दशक्रिया विधी
शनिवार दि.२५.०७.२०२६ रोजी सकाळी ८ वा.
शोकाकुल
॥ ठिकाण ॥
पाझर तलाव,राजणगाव देशमुख
ता.कोपरगाव जि.अहिल्यानगर
समस्त गोर्डे पाटील परिवार व आप्तेष्ट
युवा कितंनकार ह.भ.प.शरद महाराज ढवळे यांचे प्रवचन होईल.
भावपूर्ण श्रद्धांजली -
हासे पाटील व दैनिक युवावार्ता परिवार, संगमनेर

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु।।, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
अत्याधुनिक लॅमिनार ऑपरेशन थिएटर
शस्त्रक्रिया
• मेंदुविकार शस्त्रक्रिया • किडनी शस्त्रक्रिया
• खुबा प्रत्यारोपण • मुत्रविकार शस्त्रक्रिया
• गुडघा प्रत्यारोपण • दुर्बिणीद्वारे पोटाच्या व
• पोटाच्या शस्त्रक्रिया • आतड्याच्या शस्त्रक्रिया
२४ तास सुविधांसाठी ०२४२५ - २२४७६२ मोबा. ७०३८७७०८२८

दर्शन टेक्सटाईल मार्केट
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
30% ते 70% डिस्काउंट
शालू | कांजीवरम | सिल्क पैठणी | बनारसी
संपर्क : 8390005001
जाणता राजा मार्ग, आय.डी.बी.आय बँक समोर, संगमनेर
422605

अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री-पुरूषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या
हस्तमैथुनाचे दुष्परिणाम/स्वप्नदोष/धातुपात
शीघ्रपतन/असमाधान/कमजोरी/ शुक्राणूंची कमी
गुप्तरोग/ त्वचारोग/ नपुंसकत्व/ मानसिक नैराश्य
जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन
डॉ. अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S., M.D.(A.M), M.D.(Acu)., P.G.(SEXOLOGY)
३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
अत्याधुनिक मशिनच्या सहाय्याने तपासणी करून औषधोपचार
(प्रत्येक नवीन रूग्णासाठी १ तास वेळ दिला जातो) ऑपॉईंटमेंट आवश्यक
१ लाखांहून अधिक रूग्णांवर यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13

कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25